|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : ५२ | सोमवार दि. २० डिसेंबर २०२१ ते रविवार दि. २६ डिसेंबर २०२१ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## बाई-बाटलीचा नाद प्राणावर बेतला दारुड्या बापाचा मुलाने जीव घेतला

पन्हाळा/क्राईम रिपोर्टर



बाई आणि बाटलीचा नाद लागलेला माणूस सुधारण्याच्या पलीकडे गेलेला असतो आणि त्याचा परिणाम त्याच्या संसारावर तसेच कुटुंबावर होतो. पन्हाळा तालुक्यातील माले गावात राहणाऱ्या भिकाजीचे असेच झाले होते. हाती पैसा असल्याने त्याला दुसऱ्या बाईचा नाद लागला. मात्र हि गोष्ट त्याच्या बायको आणि तरुण मुलाला समजताच घरात भांडणे ...पान २ वर

## ना पदवी, ना परवाना तरीही रुग्णालय थाटून लुटले बलात्काराच्या गुन्ह्यामुळे बोगस डॉक्टरचे बिंग फुटले

वसई/सोनू जाधव

बोगस डॉक्टर हि वैद्यकीय व्यवसायाला लागलेली एक कीड आहे. आणि या बोगस डॉक्टरांच्या चुकीच्या उपचारांमुळे कित्येक रुग्ण मृत्युमुखी पडले आहेत. पण आरोग्य विभागाचे याकडे लक्षच नसल्याने किंवा आरोग्य विभागातील बड्या अधिकारी लोकांबरोबर या बोगस डॉक्टरांची सेटिंग असल्यामुळे त्यांच्यावर केवळ थातुरमातुर कारवाई केली जाते. त्यामुळे या बोगस डॉक्टरांची आता इतका आत्मविश्वास वाढला आहे कि त्यांनी चक्क शासकीय वैद्यकीय सेवेत घुसखोरी करायला सुरुवात केली आहे. कोणतीही वैद्यकीय क्षेत्रातील पदवी नसताना आजही काही बोगस डॉक्टर आरोग्य विभागात तसेच सरकारी रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करून सरकारला, तर चुना लावतच आहेत, पण सरकारी रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणाऱ्या गरीब रुग्णांच्या आरोग्याशी खेळ खेळत आहेत. विरार पोलिसांनी सुनील वाडकर नावाच्या अशाच एका बोगस डॉक्टरला अटक केली असून विरारमध्ये त्याची दोन रुग्णालये आणि काही क्लिनिक आहेत. इतकेच नव्हे तर त्यांनी वसई विरार महापालिकेच्या सेवेत मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून जवळपास चार ते पाच वर्ष सेवा बजावली आहे. आणि सगळ्यात धक्कादायक बाब म्हणजे वसई विरार परिसरातील बोगस डॉक्टरांच्या विरोधात पालिकेने राबवलेल्या शोध मोहिमेचा प्रमुख डॉ.सुनील वाडकर हाच होता. आता जो स्वतःच बोगस डॉक्टर आहे, तो इतर बोगस डॉक्टरांना कसा काय पकडणार? मात्र त्याला अटक झाल्यानंतर त्याचे जे एकेक कारनामे उघडकीस येत आहेत... देव माणूस सिरीयल मधल्या क्रूरकर्मा बोगस डॉक्टर अजित कुमार देव याच्याही पेक्षा भयानक असून त्याची आता कसून चौकशी सुरु आहे.




बोगस डॉक्टर सुनील वाडकर

डॉ.सुनील वाडकर माणसाच्या रूपातला एक सैतान असून त्याची पालिकेत कुणी आणि कशी नियुक्ती केली? त्यावेळी पालिका आयुक्त आरोग्य विभागाचे सभापती कोण होते? डॉ. वाडकर याची तत्कालीन पालिका प्रशासन आणि सत्ताधारी बहुजन विकास आघाडीला माहिती नव्हती का? या सर्व प्रश्नांची उत्तरे आम्हाला मिळायलाच हवी, अशी मागणी वसई विरारच्या जनतेने केली आहे. या बोगस डॉक्टरवर बलात्काराच्या दोन तर विनयभंगाची एक केस दाखल आहे. त्यामुळेच या बोगस डॉक्टरचा पर्दाफाश झालाय! वैद्यकीय शाखेतील कोणतीही पदवी नसताना वसई विरार मध्ये सुनील वाडकर नावाचा बोगस डॉक्टर दोन खाजगी हॉस्पिटल चालवीत असल्याची एक




फिर्याद विरार पोलिसांकडे आली होती. याच फिर्यादीच्या आधारे पोलिसांनी विरार फाटा येथील बावखल मांडवीमध्ये असलेल्या वाडकर याच्या हायवे रुग्णालयावर धाड टाकली आणि त्याच्याकडे असलेल्या वैद्यकीय परवान्याची तसेच इतर कागदपत्रांची पाहणी केली असता त्याच्याकडे वैद्यकीय क्षेत्रातील कोणतीही ...पान २ वर

### पोलीस आयुक्तांनी गांभीर्याने घेतल्यामुळेच बोगस डॉक्टर सुनील वाडकर गजाआड!



अत्यंत भयंकर अशा या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मीरा-भाईंदर वसई-विरारचे पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी बोगस डॉक्टर सुनील वाडकर याला पकडण्यासाठी अत्यंत योजनाबद्ध रित्या आखणी केली होती आणि पोलिसांना तसे निर्देश दिले होतेय त्यामुळेच सुनील वाडकर पुराव्यानिशी पोलिसांच्या जाळ्यात अडकला. याबद्दल वसई-विरारची जनता पोलीस आयुक्तांचे अभिनंदन करीत आहे.

## वासनेपुढे वात्सल्य कमजोर ठरले आईने पोटच्या मुलाला ठार मारले



मयत मनन

सांगली/क्राईम रिपोर्टर

सांगली अनैतिक संबंध खूप वाईट असतात. त्यात एकदा का माणूस गुरफटला कि त्याला समाजाची किंवा रक्ताच्या नात्याचीही परवा नसते. क्षणिक शरीरसुखासाठी माणूस कुठल्याही थराला जातो आणि त्यातूनच त्याच्या हातून गुन्हा घडतो. वाळवा येथील विवाहिता प्राची हिच्याबाबतीत सुद्धा असेच झाले. तीन वर्षांच्या मुलाला घेऊन प्रियकरासोबत मुंबईला पळून गेलेल्या प्राचीला त्यांच्या अनैतिक संबंधात मुलाचा अडसर येतोय असे वाटू लागताच त्या जन्मदात्या आईने केवळ स्वतःच्या सुखासाठी प्रियकराच्या मदतीने आपल्या तीन वर्षाच्या मुलाचा खून केला आणि त्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी त्या दोघांची कसून चौकशी करून या खुनाचा पर्दाफाश करीत दोन्ही आरोपींना अटक केली.



आरोपी प्राची



आरोपी अमरसिंह

सांगली जिल्हयातील वाळवा येथील सुशांत वाझे याचा विवाह वाकुर्डे येथील प्राची हिच्या बरोबर गेल्या चार पाच वर्षापूर्वी समाजाच्या रितीरिवाजानुसार झाला.या दाम्पत्याच्या संसार वेलीवर फुल उमलले. त्यांना एक मुलगा झाला. त्यांनी त्याचे नाव मोठया लाडाने मनन असे ठेवले. मनन हा सध्या ३ वर्षाचा होता. सुशांत याच्या घरची परिस्थीती ही बेताची असल्याने तो वाळवा येथे कामाला जात होता. घर संसार हा व्यवस्थीत आणि सुरळीत चालू असताना गेल्या एक दीड वर्षापासून प्राची हिच्या राहणीमानात वागण्या बोलण्यात फरक पडलेला दिसून येत होता. ती आपल्या मोबाईलवरून तास न तास कोणाशी तरी बोलत असायची. मनमोकळेपणाने हसत खिदळत बोलत असल्याने सुशांत याच्या घरच्या लोकांना तिच्या वागण्याची शंका येवू लागली होती. त्यांनी ही गोष्ट सुशांतच्या कानावर घातली असता त्याने या गोष्टीचा जाब प्राची हिला विचारला.त्यावर तिने त्याला उलट विचारीत तुम्ही आणि तुमचे घरचे लोक माझ्या चारित्र्यावर संशय घेवू लागला आहात म्हणून भांडण काढले.

अलिकडे प्राची ही काही तरी निमित्य काढून आपल्या माहेरी वाकुर्डे येथे जात होती. आठ पंधरा दिवस ती वाळव्याला येत नव्हती. त्यामुळे सुशांत आणि त्याच्या घरच्या लोकांना तिची शंका येवू लागली होती. त्यांनी याबाबत तिच्या माहेरी ही चौकशी केली असता ती माहेरी आली की दोन तीन दिवसात मनन ...पान २ वर

## रोजच्या त्रासाला कंटाळून केला प्रतिकार गरीब पती - पत्नीला शेजाऱ्याने केले ठार



अकोला/क्राईम रिपोर्टर

एखादा माणूस कमजोर असला कि त्याच्या कमजोरीचा गैरफायदा घ्यायला सगळेच तापलेले असतात आणि मग त्याला कुठल्या ना कुठल्या कारणावरून त्रास देऊ लागतात. अकोला जिल्ह्यातील सिरसो गावात किशोर गिरी त्याची पत्नी दुर्गा मुलगा रोहन आणि आई जिजा यांच्यासह राहत असतं. हे कुटुंब मोलमजुरी करून कसा तरी आपला गुजारा करीत होते. मात्र त्यांच्या याच गरिबीचा आणि साधेपणाचा त्यांच्या शेजाऱ्यांनी फायदा घेतला आणि गिरी कुटुंबाला त्रास द्यायला सुरुवात केली. मात्र हे गरीब कुटुंब कोणताही प्रतिकार करीत नव्हते आणि ज्या दिवशी त्यांनी प्रतिकार केला. त्या दिवशी शेजारी राहणाऱ्या महिलेने आपल्या जावयाच्या मदतीने गिरी कुटुंबावर हल्ला केला. त्यात गिरी पती पत्नीचा मृत्यू झाला, ...पान २ वर

## भाईगिरीचा शेवट भयंकर झाला दुश्मनांच्या हातून घातकभाई मेला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत घातक

भाईगिरीतून निर्माण झालेला वर्चस्वाचा वाद कधी कधी माणसासाठी खूपच घटक ठरतो. जळगाव मधील पवन सोनावणे याच्या बाबतीत सुद्धा असेच झाले. तो भाई बनल्याने त्याला दुश्मन हि बरेच निर्माण झाले होते आणि त्यांना घतकाचे वर्चस्व मोडून काढायचे होते आणि त्यातूनच घातकाला थेट त्याच्या घराजवळ येऊन दोघांनी आव्हान दिले. यावेळी घातक आणि त्या दोघांमध्ये झालेल्या वादात घातक मारला गेला आणि त्याच्या भाईगिरीचा अंत झाला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.



जळगाव शहरातील आदित्य चौक रामेश्वर कॉलनी परिसरात पवन मुकुंदा सोनवणे हा तरुण रहात होता. वयाची पंचविशी गाठलेल्या पवनच्या अंगी भलताच जोश होता. रहात असलेल्या परिसरात तो आपले वर्चस्व दाखवण्यासाठी प्रयत्नशील रहात होता. आपल्या विरुद्ध बोलणाऱ्या आणि वागणाऱ्यासोबत दोन हात करण्याची तयारी तो ठेवत असे. घातक शस्त्र देखील तो बाळगत असे. पवन याच्याविरुद्ध पोलिस स्टेशनला पंधरा गुन्हे दाखल होते. त्यामुळे घातक या नावाने तो रहात असलेल्या एरियात लोकांना परिचित होता. त्याच्या पवन या नावाऐवजी लोक त्याला घातक या



आरोपी सागर आणि विशाल

नावानेच ओळखत होते. बालपणापासून तरुणपणाच्या पंचविशीपर्यंत तो वर्चस्वाची लढाई लढत आला होता. आपण एरियाचे दादा आहोत हे सिद्ध करण्याच्या प्रयत्नात त्याचा वेळ आणि त्याची शक्ती खर्ची पडत होती. तो रहात असलेल्या परिसरापासून जवळच असलेल्या सिद्धार्थ ...पान ६ वर

## अनैतिक संबंधामुळे घरातील वाद वाढला बापाच्या प्रेयसीचा मुलानेच काटा काढला



चंद्रपूर/क्राईम रिपोर्टर

पतीपासून समाधानी नसलेल्या बायका पैसा आणि शरीरसुख यासाठी दुसऱ्याला जवळ करतात. अशावेळी जर बाई देखणी आणि गच्च भरलेली असेल तर कुणीही तिच्यावर फिदा होतो. चंद्रपूरमध्ये राहणाऱ्या एका कंत्राटदाराचे सुद्धा तसेच झाले होते. तो एका विवाहितेच्या जाळ्यात अडकला आणि तिच्यावर पैसा उडवू लागला. हि गोष्ट त्याच्या तरुण मुलाला सहन झाली नाही आणि त्याने एकेदिवशी आपल्या चुलत भावाच्या मदतीने बापाच्या प्रेयसीचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

रमाबाईनगर परिसरात कमलेश (काल्पनिक नाव) हे कंत्राटदार म्हणून काम करीत होते.ते गेल्या काही वर्षापूर्वी आपल्या पत्नी, मुलासह येथे बिहार राज्यातून येथे आले त्यावेळी त्याचेसोबत त्याचे नातेवाईक व भावाचा अल्पवयीन मुलगा ही होता. कमलेश हे कंत्राटदार म्हणून काम करीत असल्याने त्याचे ...पान ६ वर

## खूनाच्या गुन्ह्याची उलघडली रूपरेषा 'तेरे नाम'ने दाखवली तपासाची दिशा

विरार/क्राईम रिपोर्टर



मयत संदीप

कुठल्याही व्यवसायात वाटणी हि खूप महत्वाची असते. ती जर व्यवस्थित झाली नसेल तर त्यातून वाद निर्माण होतात आणि हे वाद एखाद्याच्या प्राणावर कशाप्रकारे बेतू शकतात हे अर्नाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या एका खुनाच्या घटनेतून बघायला मिळाले आहे. विशेष म्हणजे कोणताही ठोस पुरावा नसताना पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटवण्यापासून ते आरोपींना अटक करण्यापर्यंत जी कामगिरी केली ती खरोखरच कौतुकास्पद म्हणावी लागेल. 'तेरे नाम' या दोन शब्दांचा उलगडा करून पोलीस आरोपीपर्यंत पोहचले. हे खरोखरच आश्चर्यकारक होते आणि याचीच सर्वत्र चर्चा होत असून पोलिसांचे अभिनंदन केले जात आहे.



पोलिसांनी याबाबत दिलेल्या माहितीनुसार १०/१२/२०२१ रोजी सकाळी ८.१५ वाजता अर्नाळा पोलिसांना माहिती मिळाली कि बावखलमध्ये पाण्यात बुडून मेलेल्या एका अज्ञात इसमाचा मृतदेह पडलेला आहे. सदर माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा अरुण मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवून दिला. तसेच या प्रकरणी अर्नाळा पोलीस ठाण्यात गु.र.क्रमांक ७७/२०२१ सीआरपीसी १७४ प्रमाणे अकस्मात मृत्यू म्हणून दाखल करण्यात आले. त्यानंतर तपासाला सुरवात झाली. मयात इसमाच्या डाव्या डोळ्याच्या भुवई जवळ जखामा झाल्याने डोळा दिसत नव्हता. त्यानंतर परिमंडळ -३ चे पोलीस उपायुक्त व नालासोपारा विभागाचे ...पान २ वर

## आजीचा खून करून नातू फरार झाला ७ वर्षांनी अखेर पोलिसांच्या हाती आला

मुंबई/एस.कुमार

कोणताही आरोपी किती जरी शातीर दिमाग असला तरी पोलिसांच्या हातून तो कधीच सुटू शकत नाही. तो किती काळ जरी लपून बसलेला असला तरी पोलीस कधीना कधी त्याच्यापर्यंत पोहचतात. कारण कानुन के हात बडे लंबे होते है...! नातवाच्या पहिल्या लग्नाचे बिंग फोडल्याने चिडलेल्या नातवाने आजीची हत्या करून पळून गेला होता. मात्र पोलिसांनी सात वर्षांनी त्याच्या मुसक्या आवळल्या आणि त्याला गजाआड केले.



१३ जून २०१४ रोजी अंधेरी पूर्वकडील मिलेटरी रोड, के.बी.एम कंम्पाऊड शेजारील गणपत चाळ, खोली नंबर ३ मधून अंत्यत दुर्गंधी येत असल्याची माहिती पवई पोलिसांना मिळाली होती. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. तेव्हा घराचा दरवाजा बंद होता. त्याला बाहेरून कुलूप लावलेले होते. त्या बंद खोलीच्या आत मधून दुर्गंधी येत होती. पोलिसांनी दोन पंचासमक्ष त्या घराचा दरवाजा तोडून आत मध्ये प्रवेश करताच तेथील दुर्गंधीने श्वास घेणेही मुश्किल झालं होतं .पण त्याही परिस्थिती पोलिसांनी आपले कार्य चालुच ठेवले. त्या घरात एका ७५ वर्षाच्या महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला होता. त्या मृतदेहाची ती अवस्था पाहिल्यानंतर पोलिसांचं मन द्रवले होते. हत्या करणाऱ्या व्यक्ती ने किती निष्ठुरपणे या महिला जीवानिशी मारले होते, हे पाहता क्षणीच दिसत होते. पवई पोलिसांनी तो मृतदेह ताब्यात घेऊन त्याचा पंचनामा केला आणि तो शवविच्छेदनासाठी रवना केला . शवविच्छेदन अहवालात या महिलेची गळा दाबून तिची हत्या करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले होते. या प्रकरणी पोलिसांनी मृतक महिलेचा भाऊ दत्ताराम मारोती वाघमारे (वय ५५) यांच्या फिर्यादी वरून अज्ञात आरोपी विरोधात पवई पोलीस ठाण्यात गु.र.क्र . २५१/२०१४, कलम ३०२, ४५२, ३९४, ३४२ ...पान ६ वर

## पान १ वरून....

### ना पदवी ना परवाना तरीही रुग्णालय ...

पदवी नसल्याचे आढळून आले. तसेच त्याचे रुग्णालय सुद्धा बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास आले आणि सर्वात महत्वाच म्हणजे वैद्यकीय परिषदेत नोंदणी असल्याचा जो ८६८३५ हा नंबर त्याने दिला होता तो बंगळूर येथील डॉ. सतीश मनी याचा असल्याचे समजले आणि त्याचा कालावधी २००७ मधेच संपला होता. त्यानंतर डॉ. मनी यांनी त्याचे कोणत्याही प्रकारे नुतनीकरण केले नव्हते आणि आता डॉ. मनी यांच्या त्याच नोंदणी क्रमांकाचा वापर सुनील वाडकर करीत होता. त्यामुळे त्याला अटक करून त्याच्या विरुद्ध विरार पोलीस ठाण्यात कलम ४१९,४२० महाराष्ट्र वैद्यकीय अधिनियम १९६१ अन्वये ३३ तसेच याच कायद्याअंतर्गत कलम ३७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशीत या बोगस डॉक्टरचे अनेक कारनामे उघडकीस आले असून त्याने मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून वसई विरार महापालिकेच्या सेवेत असताना १२२ कोटींचा घोटाळा केला होता. पालिकेच्या आरोग्य विभागात आरोग्य कर्मचारी डॉक्टर्स, परिचारिका आदी पुरवण्याचे कंत्राट डॉ.वाडकरांच्या पत्नी आरती वाडकर यांनी घेतले होते, त्यात मोठा घोटाळा झाला होता आणि २०१८ मध्ये हा घोटाळा उघडकीस आल्यावर २५ ठेकेदारांवर विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नंतर हे प्रकरण आर्थिक गुन्हा शाखेकडे वर्ग करण्यात आले होते. डॉ. वाडकर हे पालिका सेवेत असताना ते खरे आहेत कि बोगस आहेत याची तर तपासणी झालीच नाहीत. उलट त्यांच्या पत्नीला एवढा मोठा ठेका कसा देण्यात आला आणि या घोटाळ्यात पालिकेच्या आरोग्य विभागाचे तसेच सत्ताधारी बविआचे कोण कोण लोक होते याची चौकशी व्हायला हवी. तसेच स्थानिक पोलीस प्रशासनाच्या वतीने सुनील वाडकरने नैसर्गिक मृत्यू म्हणून आजवर किती खून पचवले आहेत याचीही चौकशी व्हायला हवी. सुनील वाडकर यांची पत्नी डॉ.आरती वाडकर या बीडीएस असताना ट्रामा केअर सेंटर ऑपरेशन करण्याची त्यांना आरोग्य विभागाची मंजुरी कशी मिळाली. ज्या डॉ. मनी यांचा रजिस्ट्रेशन नंबर सुनील वाडकर वापरतोय त्या डॉ. मनी यांचा काहीच थांगपत्ता लागत नाही, त्याला सुनील वाडकर यानेच गायब केले नाही ना? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. वसई विरार महापालिकेचे विद्यमान आयुक्त गंगाधारण डी. यांनी याबाबत बोलताना सांगितले कि २००७ मध्ये वसई नगर परिषद असताना डॉक्टर आणि इतर वैद्यकीय कर्मचारी कंत्राटी पद्धतीने नेमले जायचे. हा ठेका डॉ.आरती वाडेकर यांच्या एजन्सीला मिळाला होता. त्यांनी आपल्याच पतीला या ठेक्याद्वारे पालिकेच्या सेवेत घेतले, त्यानंतर दोन वर्षात वसई- विरार महापालिकेची स्थापना झाली आणि सुनील वाडकर मुख्य वैद्यकीय अधिकारी बनला. २०१३ मध्ये पालिकेने हा ठेका रद्द करून स्वतः नियुक्त करण्याचे ठरवले, तेंव्हा बिंग फुटण्याच्या भीतीने वाडकरने राजीनामा देऊन गाशा गुंडाळला. आता या बोगस डॉक्टरची कशी चौकशी होते आणि त्यातून काय काय बाहेर पडतेय याकडे सर्वांचे लक्ष लागलेय!

### बाई-बाटलीचा नाद प्राणावर बेतला...

होऊ लागली. त्यातून भिकाजी पत्नीला मारहाण करू लागला. दारू पिऊन घरात तमाशा करू लागला. एकेदिवशी असाच दारू पिऊन पत्नीला मारहाण करीत असताना मुलाला सहन झाले नाही आणि त्याने रागाच्या भरात बापाच्या डोक्यात फावड्याचे घाव घालून त्याला ठार मारले आणि फरार झाला. मात्र पोलिसांनी त्याला शोधून काढले आणि अटक केली. पन्हाळा तालुक्यातील माले येथे भिकाजी वगरे हे आपल्या आई पत्नी,दोन मुलासह राहयला आहेत. त्यांनी एका मुलीचे लग्न गेल्या तीन वर्षापूर्वी केल्याने ती तिच्या सासरी राहते. तिला ही एक मुलगा झाला असल्याने भिकाजी वगरे हे वयाच्या ४७ व्या वर्षी आजोबा झाले होते. तसे त्याचे कुंटूंब हे सधन आणि सुखवस्तु घरातील असल्याने कुठल्या ही गोष्टीची कमतरता नव्हती. त्याचा अजित नावाचा मुलगा २४ वर्षाचा झाला असल्याने तो ही आता हाता खाली आला होता. वगरे यांची गावात थोडीफार शेत जमीन असल्याने त्या शेतावरच त्याचा उदर निर्वाह चालत होता. ऊसाचे नगदी पीक असल्याने हातात त्याचे कायम पैसे खुळखुळत होता. त्यातून त्याचे अलिकडे गावातील एका महिलेबरोबर संबंध जुळले होते. ते त्या महिलेच्या नादी लागून तिच्यावरच सगळा पैसा खर्च करीत असल्याने त्याचे आपल्या कुंटूंबाकडे, पत्नी मुलाकडे आईकडे दुर्लक्ष झाले होते. सुरूवातीला त्याच्या पत्नीला आणि मुलांना त्याचे ते विवाहबाहय संबंध माहित नव्हते. परंतु माले सारख्या लहान गावात कुठे काही माशी शिंकली की लगेच गावात त्याची चर्चा होत होती. तशी चर्चा भिकाजी आणि त्या महिलेच्या संबंधाची ही होत होती. ही चर्चा भिकाजी याच्या पत्नीच्या कानावर आल्याने ती या कारणातून त्याच्या बरोबर भांडण काढत होती.त्यामुळे भिकाजी ही तिला भांडणात मारहाण करीत गप्प बसविण्याचा प्रयत्न करीत होते. चांगल्या कुंटूंबातील कोणतीही महिला आपल्या नवऱ्याचे सगळे काही सहन करू शकते परंतु नवऱ्याचे बाहेरचे प्रेम ती सहन करू शकत नाही. कारण तिला सगळ्यात वाटणी झालेली चालते परंतू नवऱ्यात तिला वाटणी नको असते नवरा जर बाहेरच्या बाईच्या नादाला लागला तर कुंटूंबाची वाताहात होते. हे तिला चांगले माहित असते म्हणून ती त्याला रोखण्याचा प्रयत्न करीत असते. तेच भिकाजी वगरे याची पत्नी करत होती.परंतू भिकाजी हा त्या बाईच्या इतके आहारी गेले होते. की त्यांना त्या बाई शिवाय दुसरे काहीच दिसत नव्हते, सुचत नव्हते. त्यातच ते अलिकडे दारू पिऊन येऊन घरात गोंधळ घालत होते. नेमका या गोष्टीचा राग त्याचा मुलगा अजित याला देखील येत होता. एका परक्या बाई वरून डोळ्या देखत आपल्या आईला वडिल मारहाण करीत असतात हे त्याला देखील सहन होत नव्हते. आईला मारहाण करीत असताना त्याने बऱ्याच वेळेला वडिलाना रोखले होते. त्याना बाजुला करून समजावून सांगितले होते. तरी ही भिकाजी हे आपलेच खरे म्हणून वागत होते. सकाळपासून दारू प्यायला सुरूवात केली की रात्री झोपेपर्यंत दारू प्यायचे घरात घाण घाण शिव्या देऊन पत्नी मुलांना त्रास करायचा हा त्याचा कायमचा हेका ठरला होता. त्याच्या आईने त्याच्या समोर आपले हात ठेकले होते. तिच्या ही सांगण्याचा परिणाम त्याचेवर झाला नव्हता. आता तर ते गावातील त्या महिलेच्या घरातच राहु लागले होते.त्यामुळे गावात त्याच्या पत्नी मुलानां मान खाली घालावी लागत होती. घरात आले की भांडणाला सुरूवात होत होती. अजित आणि त्याच्या आाईला यातून काय करावे काय नको असे झाले होते. भिकाजी हे सांगून ही ऐकत नव्हते. म्हणून अजित आणि त्याच्या आईने त्या बाईला भेटून तिला भिकाजीचा नाद सोड माझ्या संसारात विष कालवू नकोस असे सांगितले परंतु ती बाई ही इतकी बिलंदर निघाली की उलट तिने त्यानंचा खडे बोल सुनावत मी काही त्याच्या नादाला लागली नाही, उलट तुझा नवराच माझ्याकडे रात्र आणि दिवस पडून असतो. तु त्याला जे पाहिजे आहे ते देत नाहीस म्हणून तर तो माझ्याकडे येतो असे सांगून त्याना उलटा रस्ता दाखविला होता. त्या बाईचे विचित्र वागणे बघून अजित आणि त्याची आई माघारी फिरली होती. नंतर त्या बाईने भिकाजी याला तुमच्या बायकोने आणि मुलाने मला मारण्याची धमकी देवून तुमचा नाद सोडा असे सांगितल्याचे सांगून त्याना चिथवले होते. आपण ठेवलेल्या बाईला बायको आणि मुलगा धमकी देतो म्हणजे काय हा विचार करून भिकाजी चांगलेच त्या दोघावर चिडले होते. त्यानी घरात येवून पत्नी मुलग्याला तुम्ही का तिच्याकडे गेला होता म्हणून विचारीत भांडण काढले. ते त्या बाईला विचारला गेले पण याचा परिणाम उलटाच झाला होता प्रकरण मिटण्या ऐवजी वाढतच गेले होते. घरात या कारणातून तीन चार दिवस भांडणे होऊ लागली होती. इकडे त्याच्या विवाहित मुलीने ही त्याना फोनवरून पप्पा तुम्ही आईला मारत जावू नका, चांगले वागा. नातू झाला आहे जरा सुधारा तुमच्या अशा वागण्याने माझ्या सासरी ही बदनामी होत आहे असे सांगून पाहिले. परंतू तिच्या ही सांगण्याचा त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही. आता तर ते त्या बाईच्या सांगण्यावरून घरात जास्तच वाद घालू लागले होते. त्यामुळे त्याच्या पत्नी मुलांना आता संसार मोडणार की काय असे वाटत होते. नवरा बायकाचे भांडण विकोपाला गेले होते. घरात आणि नातेवाईकांत भिकाजी याच्या अशा वागण्याने अब्रु जात होती. नातू झाला तरी त्याचे बाहेरख्याली वागणे कमी झाले नाही. अशातच भिकाजी हे त्या बाईला मी आता घरातच आणून ठेवतो म्हणजे सगळे काही व्यवस्थीत होईल अशी बायको मुलाना धमकी देवू लागले होते. सततची होणारी भांडणे, त्यातून वडिल आईला करीत असलेली मारहाण याने अजित हा देखील वैतागलेला होता. त्याला ही कोणाची बाजू घेऊन बोलायचे हे समजत नव्हते. आपण आता २४ वर्षाचे झालो तरी आई वडिलाच्यातील भांडणे थांबत नाहीत आपले पुढे कसे होणार याची चिंता त्याला सतावत होती. तसा तो थोडा रागीट स्वभावाचा होता. मागे एकदा दोनदा त्याच्या आईला मारहाण करीत असताना भिकाजी याना त्यानेच त्याना चांगलेच चोप दिला होता.तरी ही ते काही सुधारत नव्हते. तो तरी त्याना किती समजावून सांगणार होता. वडिलांचे चप्पल आता त्याच्या पायात येत होते. वडिल आईला मारहाण करीत असताना तो त्याच्या वर चिडत होता. त्याना मागे ढकलत होता.वडिलाच्या अशा वागण्याने शेजाऱ्यात त्याचा तमाशा होत होता. गुरूवार रात्री भिकाजी हे घरात दारूच्या नशेत आले. त्याना नीट उभे ही राहता येत नव्हते. ते हलत डूलत असताना त्याची पत्नी त्याचेवर तोंड सुख घेत होती. ते ही तिला त्याच भाषेत सांगत होते. त्या भांडणात पुन्हा त्या बाईचा विषय निघाला. तसे भांडण पेटले.घरात भिकाजी याच्या वयोवृध्द आई शिवाय कुणीच नव्हते. अजित हा बाहेर गेला होता.नवरा बायकाचे भांडण वाढले तसे दारूच्या नशेत असणाऱ्या भिकाजीने पत्नीला लाथा बुक्कांनी मारहाण करायला सुरूवात केली. तसे ती ओरडू लागली होती.त्याला शिव्या शाप देत दुसऱ्या बाईच्या नादाला लागतोस आणि मलाच मारहाण करतोस असे ओरडत होती. त्यातच भिकाजी याने हातात लाकडी दांडा घेतला होता. त्या दांड्याने ते तिला मारहाण करीत असताना तेथे अजित आला. आईला वडिल दारूच्या नशेत मारहाण करीत आहेत हे बघून त्याने त्याना बाजुला ढकलून देत आईला त्याच्या तावडीतून सोडविले. मुलगा आल्याचे व त्याने बाजुला ढकलून दिल्याचे बघून भिकाजी हे दारूच्या नशेत त्याला ही शिव्या देत तु कोण रे माझ्या लफडयात लक्ष घालणार म्हणून त्यालाच याचा जाब विचारू लागले. वडिलांचा संयम आणि तोल चालला होता. घरात तमाशा चालू झाला आहे. वडिल काही ऐकत नव्हते. शेजारी हे त्यावेळी झोपी गेले होते. त्यांनी तर अलिकडे त्याच्या भांडणात लक्ष घालण्याचे कमी केले होते. वगरे याच्या घरात हे नेहमीच आहे असे म्हणून नेमके त्यांनी त्यावेळी त्या भांडणाकडे दुर्लक्ष केले. अजित हा त्याना बाजुला ढकलत मारहाण करू लागल्यावर भिकाजी यांनी त्याला तुला ही बघून घेतो म्हणत परत ते त्याच्या अंगावर जावू लागले. तेवढयात अजित याने अंगावर धावून येणाऱ्यां वडिलाना रोखत होता. पण ते जास्तच चिडले होते. ते त्यालाच मारायला येत असल्याचे बघून घरातील बाहेरच्या अंगणात पडलेला लोखंडी फावला उचलला आणि रागाच्या भरात त्याच्या डोक्यावर घातला. त्यासरशी भिकाजी याचे डोके फुटून त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. ते ही ओरडत किंचाळत खाली पडले. वगरे याच्या घरात चाललेल्या भांडणाने शेजारी ही आता तेथे आले होते. भिकाजी याच्या डोक्याला वर्मी घाव लागल्याने ते गंभीर जखमी झाले होते. शेजाऱ्यांनी अजित याला बाजुला करत जखमी भिकाजी याना एका खाजगी वाहनात घालून उपचारासाठी कोडोली येथील एका दवाखान्यात नेले. परंतू तेथील उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. मुलाने मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याने कुणी तरी या घटनेची माहिती कोडोली पोलीसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनास्थळाचा आणि घटनेचा पंचनामा केला. ही घटना कोणत्या कारणातून कुणाच्या हातून घडली आहे याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या घटनेनंतर अजित हा फरार झाला होता. पोलिसांनी त्याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलिसांनी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलिसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलिसांनी मयत भिकाजी वगरे याच्या नातेवाईकाच्या फिर्यादीवरून कोडोली पोलिसाात भिकाजी शंकर वगरे (वय ४७) याच्या डोक्यात लोखंडी फावडयाने वार करून खून केल्याने त्याचा मुलगा अजित भिकाजी वगरे (वय २४) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलिसांनी त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला लोंखडी फावडा जप्त केला. या घटनेचा पुढील तपास कोडोली पोलीस स्टेशनचे स.पो.नी.शितलकुमार डोईजड हे करीत आहेत. बाहेरख्याली वागण्याने कुंटूंबात कलह हा होतोच. त्यातूनच अशा अघटित घटना घडतात हेच या गोष्टीवरून दिसून येते. म्हणूनच बाहेरख्याली वागण्याने कधीच कुणाचे चांगले होत नाही. तरीही बाहेरख्याली संबंधात अनेक पुरूष अडकत असतात. यासारखे दुर्दैव ते कोणते असेच म्हणावे लागेल.

### रोजच्या त्रासाला कंटाळून केला प्रतिकार...

तर त्यांची वृद्ध आई गंभीर जखमी झाली. मुलगा घरात नसल्याने बचावला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे. अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यात सिरसो नावाचे मध्यम लोकवस्तीचे गाव आहे. मूर्तिजापुर शहरापासून अगदी तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावातील लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. मुर्तीजापुर शहर गावाला लागून असल्यामुळे सिरसो येथील ८५ टक्के तरुण मूर्तिजापूर येथे कामानिमित्त जात असतो. अकोला जिल्ह्यात प्रसिद्ध असलेले श्री पुंडलिक महाराज देवस्थान या सिरसो गावातच आहे या गावालगत आर्थिकदृष्ट्या गरीब लोकांची एक वस्ती आहे सिरसो प्लॉट म्हणून याची ओळख आहे. या प्लॉट भागात किशोर विठ्ठल गिरी यांचे घर आहे. किशोर हा त्याची पत्नी दुर्गा तसेच सासुबाई जिजा यांच्यासोबत राहत होता. त्याच्या बाजूला बेबी मोहन गिरी, अर्चना गिरी, ईश्वर शंकर पुरी, सैय्यद जबीर असे चार जण राहतात. बेबी मोहन गिरी हिच्या घरी सय्यद जागीर हा अनेक दिवसापासून राहतो बेबी च्या मोठ्या मुलीचा विवाह तालुक्यातील खोडद येथील ईश्वर पुरी याच्यासोबत झाला. मात्र अनेक दिवसापासून ती माहेरी सिरसो येथे राहण्यास आली. बेबी गिरी हिच्या घराच्या बाजूलाच तिची मुलगी आणि जावई ईश्वर पुरी राहतात.

किशोर आणि दुर्गा यांचा परिवार अतिशय गरीब आहे. त्यांना रोहन नावाचा एक मुलगा आहे. रोहन हा मोलमजुरी करतो. दुर्गाची आई जिजाबाई ६५ वर्षाची असून मुली कडे राहते. किशोर आणि दुर्गा मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवतात. किशोर आणि दुर्गा यांच्या बाजूला रहात असलेली बेबी जावई ईश्वर आणि सय्यद जाबीर यांनी त्यांना अनेक दिवसापासून धमक्या देण्यास सुरुवात केली होती. किरकोळ कारणावरून ते किशोरसोबत वाद घालायचे. सय्यद आणि ईश्वर हे दोघे किशोरच्या परिवारावर दबाव आणत होते. किशोर, दुर्गा आणि जिजाबाई नेहमी माघार घेऊन वाद टाळत होते. सय्यद जाबीर सय्यद वहाब या दोघांनी प्लॉटवर दहशत निर्माण केली होती. कोणत्याही किरकोळ कारणावरून ते दोघे किशोर व दुर्गा यांच्या सोबत भांडण करायचे. या भांडणाचे सूत्रधार बेबी गिरी होती. बेबीच्या समाधानासाठी सय्यद विनाकारण किशोर आणि दुर्गाला मानसिक त्रास देत होता. बेबीच्या घरी सय्यद जाबीर कशासाठी राहतो याबाबत माहिती मिळाली नसली तरी हे दोघे अनेक दिवसांपासून एकत्र रहात असल्याचे समजते. बेबीची मर्जी राखण्यासह तिला समाधानी ठेवण्यासाठी सय्यद जाबीर हा अरेरावी करून किशोरच्या घरात अशांतता निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न करत होता. घरामध्ये बकरी आली, कचरा टाकला, पाणी टाकले अशा किरकोळ कारणावरून जाबीर हा किशोरच्या अंगावर धावून जायचा. सय्यद जाबीर याने केलेले कृत्य बेबीला आवडत होते. किशोर व दुर्गा यांचा परिवार गरीब असल्याने ते विनवणी करुन वाद मिटवत होते. त्यामुळे ते आपल्याला घाबरतात असे जाबीरचे मत झाले होते. त्यामुळे त्याची हिंमत वाढली होती. गेल्या अनेक दिवसापासून किशोर व दुर्गा यांच्याशी वाद करणारा सय्यद जाबीर आणि बेबी गिरी यांच्यावर कुणाचेही नियंत्रण नव्हते. त्यामुळे ते या भागात दहशतीचे वातावरण निर्माण करायचे. १९ नोव्हेंबर २०२१ रोजी दुपारी तीन वाजता किरकोळ कारणावरुन बेबीने किशोरसोबत वाद घातला. यावेळी दुर्गाने मध्यस्ती केली आणि प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला. मात्र दिवस-रात्र बेबीच्या घरी पडून असलेल्या सय्यदने शक्तिप्रदर्शन करत किशोर व दुर्गाला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. हातात पाईप घेऊन त्याच्या अंगावर धावला. सय्यद जाबीरची दहशत असल्यामुळे कुणीही त्याची मध्यस्थी केली नाही. सय्यद जाबीर आणि बेबी गिरी हे दोघे नेहमीच वाद घालत असल्यामुळे लोकांना त्यांच्या भांडणाची सवय झाली होती. नेहमीप्रमाणे बेबीने शिवीगाळ केल्याने प्रकरण वाढले. किशोर व दुर्गा यांनी देखील प्रतिउत्तर दिले. ते पती-पत्नी आपल्यासोबत वाद घालत आहेत याचा राग आल्यामुळे बेबीचा जावई ईश्वर पुरी याने घरातील लोखंडी सब्बल आणून किशोर, दुर्गा व जिजाबाई गिरी या तिघांवर प्राणघातक हल्ला चढवला. यावेळी बेबीने दुर्गाला पकडून ठेवले. सैय्यद जाबीर व ईश्वर यांनी तिघांवर लोखंडी पाईप हल्ला केला. अर्चनाने जिजाबाईच्या डोक्यात दगड मारला. लोखंडी सब्बल छातीवर बसल्यामुळे किशोर विठ्ठल गिरी याचा जागीच मृत्यू झाला. दुर्गा किशोर गिरी व जिजाबाई या गंभीर जखमी झाल्या. सय्यद जाबीर आणि ईश्वर पुरी यांनी गिरी दाम्पत्यावर प्राणघातक हल्ला चढवून किशोरचा खून केल्याची वार्ता सिरसो गावात लागलीच पसरली. मोठ्या संख्येने लोक सिरसो प्लॉट भागात धावत आले. येथील जागरूक नागरिकांनी या घटनेची माहिती मूर्तिजापूर पोलिसांना दिली. मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोविंद पांडव आपल्या ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. पोलीस घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच गावातील नागरिकांनी किशोर गिरी आणि त्याची पत्नी दुर्गा व सासु जिजाबाई यांना तातडीने मूर्तिजापूर येथील सरकारी दवाखान्यात आणले होते. मुर्तीजापुर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक पांडव यांनी घटनास्थळाची पाहणी केली. त्यांना अंगणात रक्ताचे डाग दिसून आले. त्यांनी घटनानास्थळी बंदोबस्त लावत रुग्णालयात आले. किशोरचा जागीच मृत्यू झाला होता अशी माहिती डॉक्टरांनी त्यांना दिली. दुर्गा आणि जिजाबाई यांची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्या दोघांना अकोला येथील रुग्णालयात रवाना करण्यात आले. उपचारादरम्यान दुर्गाचे निधन झाले. जिजाबाईची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्यांना नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले. किशोर आणि दुर्गा यांना रोहन नावाचा एक मुलगा आहे. आईवडिलांचे निधन झाल्यामुळे तो पोरका झाला. तो मोलमजुरी करतो तसेच तो अविवाहित असून आई-वडिलांवर अवलंबून होता. मात्र या गाव गुंडांनी त्याच्या आई-वडिलांना संपल्यामुळे तो मानसिकरित्या खचला. रोहन गिरी याच्या तक्रारीनुसार मूर्तिजापूर पोलिसांनी गु.र.न.४४१/ २०२१ कलम ३०२, ३०७, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेतील आरोपी बेबी मोहन गिरी, अर्चना, सय्यद जाबीर यांची नावे समोर आल्यामुळे पोलिसांनी त्यांची शोधाशोध केली. या घटनेतील मुख्य सुत्रधार ईश्वर शंकर पुरी हा गावातून पसार झाला. बेबी शेतात लपून बसली. पोलिसांनी सर्व आरोपींची माहिती संकलित केली. बेबीला शेतातून तर अर्चनाला तिच्या घरातून ताब्यात घेन्यात आले. सय्यद जाबीर पळून जाण्याच्या बेतात असताना पोलिसांच्या हाती लागला. आरोपी ईश्वर शंकर पुरी यांच्या शोधार्थ पोलीस पथक रवाना करण्यात आले. मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी आजूबाजूच्या सर्व पोलीस स्टेशनला या घटनेची माहिती दिली. फरार आरोपी ईश्वर पुरी याचा शोध घेण्यासाठी बाबत विनंती केली. ईश्वर पुरी याचे मूळ गाव माना पोलीस स्टेशनच्या हद्दीतील खोडद हे आहे. ईश्वर गावात लपून बसल्याची माहिती मूर्तिजापूर पोलिसांना समजली. त्यांनी ही माहिती माना पोलिसांना दिली. माना पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भगत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ईश्वर पुरी याला खोडद गावातून शिताफीने ताब्यात घेत अटक केली. चारही आरोपी पोलिसांच्या ताब्यात आले.

### वासनेपुढे वात्सल्य कमजोर ठरले...

याला घेवून परत वाळव्याला जातो म्हणून तेथून ही निघुन जात असल्याची माहिती त्याना मिळाली. त्यामुळे सुशांत याने ती कुठे जाते, काय करते याचा शोध घेत असताना त्याला आपल्या बायकोचे विवाहबाहय संबंध शिराळा तालुक्यातील बिळाशी येथील अमरसिंह पाटील याच्याशी असल्याची माहिती मिळाली. प्राची ही माहेरी जातो म्हणून ती अमरसिंह पाटील याला भेटायला जात होती. तो कधी बिळाशीला आला तर प्राची हिला भेटत होता. तिच्याबरोबर शरीरसुख घेऊन मजा मारूनच जात होता. तो मुंबईला कामाला आहे हे प्राचीला माहित होते म्हणून ती त्याला मला ही मुबंईला घेऊन चल मी तुझ्याबरोबर राहयला तयार आहे असे म्हणत होती. सुरूवातीला तो तिच्या म्हणण्याकडे लक्ष देत नव्हता. पण नंतर त्याला तिचे म्हणणे मान्य करावे लागले. अमरसिंह पाटील हा मुंबईत कामाला होता. त्याचे नातेवाईक वाकुर्डे येथे प्राची हिच्या माहेरी असल्याने तो वाकुर्डे येथे जात येत असताना त्याची आणि प्राचीची ओळख झाली होती. त्या ओळखीतूनच त्याचे प्रेमसंबंध जुळले होते. प्राची ही दिसायला देखणी सुंदर होती. वाळवा येथील सुशांत वाझे याच्याशी तिचा विवाह झाल्याचे त्याला माहित होते. तो ही विवाहित असल्याने तो तिच्याशी लगट करीत संबंध वाढवित होता. त्याला ही प्राची आवडली असल्याने तिच्याबरोबर ते संबंध प्रस्थापित करायला त्याला वेळ लागला नाही. कळत नकळतपणे प्राची ही त्याच्या त्या संबंधात अडकली होती. ते दोघे फोनवरून तास न तास बोलत होते.बाहेर चोरून भेटत होते. यातून त्याचे संबंध वाढीस लागल्यावर त्या दोघांनी बाहेर शरीरसंबंध ही प्रस्थापित केले. प्राचीला ही अमरसिंह याची चटकच लागली होती. ती आपल्या माहेरी जाते म्हणून त्याला भेटायला जात होती. गेल्या तीन चार वर्षापासून त्या दोघांचे संबंध जुळले होते. याची खबर सुरूवातीला सुशांत याला नव्हती. पण ज्यावेळी त्याला पत्नी प्राची ही परपुरूषाच्या नादाला लागली आहे. त्याच्याबरोबर तिचे शरीरसंबंध जुळले आहेत याची माहिती मिळाली त्यावेळेपासुन नवरा बायकोत या कारणातून दररोज भांडणे होऊ लागली होती. प्राची ही त्या संबंधात अमरसिंह याच्या नादाला लागली असल्याने तिला आता नवरा मुलगा नकोच होता. तिने या बाबात प्रियकर अमरसिंह याला बोलून ही दाखविले होते.ती त्याच्या बरोबर नवऱ्या मुलाला सोडून राहयला तयार होती. अमरसिंह पाटील ही तिला ठेवून घ्यायला तयार होता. तिच्या नागडया उघडया शरीरावर पडून मस्तपैकी मजा मारत होता. त्याला फक्त ती पाहिजे होती.तिचा मुलगा नको होता. त्या संबंधात त्याला त्या मुलाचा अडसर वाटत होता.त्याने तिला मुलासह ठेवून घेतल्याने त्याचे मित्र ही त्याला नावे ठेवत होते.तयार रेडिमेड सट्टच आणला आहेस म्हणून टिंगळ टिवाळी करीत होते.म्हणून तो प्राची बरोबर भांडत होता. ती ही त्याला त्या भांडणात मुला फक्त मी पाहिजे माझे मुल नको आहे असे म्हणत होते. येथेच त्या दोघाच्या विचारात फरक पडत होता. त्या दोघांना ही शरीर सुख घेण्याची चटक लागल्याने त्या दोघांना ही मनन याचा अडसर वाटत होता. इकडे प्राची हिचे नवऱ्याबरोबर घरातील लोका बरोबर या कारणातून सारखी भांडणे होत असल्याने ती ही दररोजच्या भांडणाला वैतागलेली होती. या भांडणातून तिने एक टोकाचा निर्णय घेतला. दि.२७ जून २०२१ रोजी ती घरात कोणाला ही काही न सांगता तीन वर्षीय मनन याला घेवून बाहेर पडली. ती परत आलीच नाही. सुशांत याने तिच्या माहेरी चौकशी केली असता ती तेथे ही गेली नव्हती. ती कुठे गेली आहे याची माहिती सुशांत याने घेतली असता त्याला आपली पत्नी प्राची ही तिचा प्रियकर अमरसिंह पाटील याच्या बरोबर मुंबई येथे पळून गेल्याची माहिती मिळाली. त्यावेळी त्याने पत्नी प्राची हिच्याशी संपर्क साधला असता तिने मी मुंबई येथे अमरसिंह याच्याबरोबर राहत असून ती माझा व मनन याचा शोध घेवू नका.मला तुमच्या बरोबर राहणार आहे. मला तुमच्या बरोबर राहयचे नाही असे स्पष्ट सांगितले.त्यामुळे सुशांत याने तिचा शोध घेण्याचे बंद करून टाकले. बायको तिच्या प्रियकरा बरोबर मुलाला घेवून पळून गेल्याने त्याची गावात नातेवाईकात बदनामी झाली होती. तो प्राचीला घटस्फोट मागू लागला होता. ती पळून गेल्यावर त्याने तिच्या माहेरच्या लोकाबरोबर भांडणे काढून मोकळीक देण्यास सांगितले होते. तिच्या माहेरच्या लोकांना ही प्राचीचे अमरसिंह पाटील याच्या बरोबर असलेले संबंध मान्य होते. त्यांनी तशी त्याला मुक संमती दिली होती. ही गोष्ट सुशांत याला माहिती झाली होती. गेल्या तीन चार महिन्यापासून प्राची ही प्रियकर अमरसिंह पाटील याच्याबरोबर मजा मारत राहत होती. तो ही तिला पाहिजे तसे सुख देत असल्याने तिला कशाचीच कमतरता नव्हती. त्याला मात्र आता त्या कामासाठी ती पाहिजे होती. पण तिचा मुलगा नको होता. त्यामुळे त्या दोघात ही आता या कारणातून भांडणे होऊ लागली होती. तिची आता इकडे आड तिकडे विहिर अशी अवस्था झाली होती. प्रियकर मुलावरून भांडण काढत होता.तर नवऱ्याला सोडून पळून गेल्याने माहेर आणि सासर ही तुटले होते. तिच्याबरोबर मजा मारत असताना तो तिला मननला तिच्या नवऱ्याकडे सोडून ये असे तिला सांगत होता. काय करावे आणि काय नको असे तिचे झाले होते. यातून तिनेच मार्ग कढायचा असे ठरविले. तिने प्रियकर अमरसिंह पाटील याला सांगून मननला आपण आपल्या मार्गतून बाजुला काढुया असे सांगितले. त्याप्रमाणे त्या दोघांनी एका रात्री मनन गाढ झोपला असताना त्या चिमुकल्याचा गळा जोरात आवळून धरला. त्याच्या गळयला नख लावीत असताना तिला त्याचे काहीच वाटले नाही प्रियकराच्या त्या संबंधात ती इतकी आंधळी झाली की,तिने स्वत:च्या मुलाचा गळा आवळला. त्याला मारून त्यांनी त्यावेळी त्याचा मृतदेह घेऊन सांगली जिल्हयातील वाकुर्डे येथे आले. वाकुर्डे येथे येवून त्यांनी आपल्या नातेवाईकांना मनन याचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचे सांगितले. तेथे त्यांनी ग्रामपंचायती कडे मनन याचा नैसग्रीक मृत्यू झाल्याचे सांगून तसे प्रतिज्ञापत्र लिहून देत मननचे मृत्यू दाखला काढला. मननचा खून करून पचला असल्याचे त्या दोघांना ही वाटत असताना वाळवा येथे सुशांत वाझे यांना एक निनावी पत्र मिळाले होते. त्या पत्रात पत्र पाठविणाऱ्याने त्याच्या मनन या तीन वर्षीय मुलाचा मुंबई येथे खून त्याची पत्नी प्राची व तिचा प्रियकर अमरसिंह पाटील यांनी करून त्याचा पुरावा नष्ट करून त्याचे अंत्यसंस्कार वाकुर्डे येथे केल्याचे म्हटले होते. या पत्रावरून सुशांत वाझे यांनी आष्टा पोलीस ठाण्यात मनन सुशांत वाझे (वय ३) याचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी पत्नी प्राची सुशांत वाझे (वय २६) व तिचा प्रियकर अमरसिंह विश्वासराव पाटील (वय ३०) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. सुशांत यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आष्टा पोलीसांनी त्या दोघांना ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी सुरूवातीला पोलीसांना ताकास तुर लागू दिला नाही. परंतू पोलीसांनी त्याना आपला पोलीसी खाक्या दाखविला असता त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. आष्टा पोलीसांनी त्या दोघा विरूध्द भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर हजर केले. मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी मुंजर केली होती. या घटनेचा पुढील तपास आष्टा पोलीस करत आहेत. विवाहबाहय संबंधात अडकलेली महिला ही त्या संबंधात इतकी भरकटते की आपल्या त्या संबंधात अडथळा ठरणाऱ्या मुलाचा ही काटा काढायला मागे पुढे पाहत नाही. त्या संबधात फक्त प्रियकराचा ठोका पाहिजे असतो बाकी काही नको असते.म्हणूनच ती कधी माता ही वैरणी बनून वागते हेच या घटनेवरून दिसून येते.

### खूनाच्या गुन्ह्याची उलघडली रूरपरेषा...

सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या सूचनेनुसार दोन वेगवेगळी तपास पथके तयार करण्यात आली. दरम्यान पोलिसांना एका गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली कि ९/१२/२०२१ रोजी रात्री ८.३० वाजता अनोळखी मयत इसम व त्याच्या सोबत सदर परिसरात शेतमजुरीचे काम करणारा 'तेरे नाम' नावाचा व आणखी एकजण असे तिघेजण मुक्कामपाडा परिसरात फिरत होते. सदर माहिती मिळताच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी यांनी अर्नाळा मुक्काम पाडा परिसरात 'तेरे नाम' या इसमाचा शोध घेतला असता 'तेरे नाम' याचे खरे नाव दिनेश माळकरी असून तो भंगार वेचण्याचे काम करीत असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी डोंगरपाडा चिखल डोंगरी भागात शोध घेऊन 'तेरे नाम' उर्फ दिनेश रघुनाथ माळकरी रा. वादजी. पालघर आणि बुध्या पवार रा. कमान रोड चिंचोटी यांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता, सुरवातीला ते उडवा उडवीची उत्तरे देवून मयतासोबत ते फिरले असल्याचे व त्याचे नाव संदीप चौधरी असे असल्याचे सांगितले. दरम्यान मयताचे ओळख पटवण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेतला असता मयताचे नाव हरेश नथू हाडल असे समजले. तसेच शवविच्छेदन अहवालात मृताच्या डोक्यात गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाल्याचे समजले. दरम्यान पकडलेल्या दोघांकडे कसून चौकशी केली असता मच्छीची वाटणी आणि भंगार विक्रीच्या पैशातून वाद झाल्याने त्याला डोक्यात दगड मारून जीवे ठार मारल्याचे त्यांनी कबुल केले. त्यानंतर त्या दोघांवर अर्नाळा पोलीस ठाण्यात गु.र. क्रमांक ४०१ /२०२१ कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. कोणताही पुरावा नसताना पोलिसांनी या गुन्ह्याचा शोध घेतला. याबद्दल पोलिसांचे अभिनंदन करण्यात येत आहे. सदर कामगिरी परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त प्रशांत वाघुड, नालासोपारा विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अर्नाळा पोलीस ठाण्याचे पो.उप. निरीक्षक हन्दल, तुषार मालोंदे सागर, पो.हवा. मदने, पो.न.राजेंद्र पवार पो.अ. अलंगे कदम संतोष पवार यांनी भाग घेतला.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातर्फे प्रा.डॉ.रावसाहेब दोरवे आणि अनिता दोरवे यांचा सत्कार संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

सेवानिवृत्तीला अवघे दोन वर्ष राहिले असताना नेट परीक्षा व पी.एचडी.पदवी संपादन करून महाराष्ट्रातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांसमोर लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यांतील हंचनाळ (नदी वाडी) येथील मुळ रहिवासी, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभाग, लातूर येथील माजी विद्यार्थी तथा जवाहरलाल समाजकार्य महाविद्यालय, नांदेड येथे कार्यरत असणारे प्रा.डॉ.रावसाहेब दोरवे यांनी निर्माण केला एक वेगळा आदर्श निर्माण केला त्याबद्दल त्यांचा आणि त्यांच्या सुविद्य पत्नी अनीता दोरवे यांचा सत्कार शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभाग, लातूर द्वारा आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमानिमित्त समाजकार्य मंडळ उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता यामध्ये सत्कार करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, स्वा. रा. ती. म.वि. नांदेडचे सिनेट सदस्य डॉ.अशोक मोटे, समाजकार्य विभागप्रमुख डॉ.दिनेश मौने, ज्येष्ठ प्राध्यापक डॉ.ईश्वर शेटकार, प्रा.काशिनाथ पवार, प्रा.अंकुश नाडे, सामाजिक कार्यकर्ते देवीदास कांबळे(नांदेड) आणि डॉ.संजय गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या अंमलबजावणीत ग्रामपंचायतीची भूमिका-एक अभ्यास (संदर्भ नांदेड जिल्हा) या विषयावर संशोधन केले असून त्यांना मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड येथील प्राचार्य डॉ.प्रकाश जाधव यांचे संशोधक मार्गदर्शक तर सह-संशोधक मार्गदर्शक म्हणून स्वा.रा.ती.म.वि.नांदेड येथील सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक प्रोफेसर डॉ.घन:श्याम येळणे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. प्रा.डॉ. रावसाहेब दोरवे यांनी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभाग, लातूर येथे १९८६ रोजी या वर्षात समाजकार्य पदवी घेतली आहे.

तसेच महाराष्ट्रातील ५२ समाजकार्य महाविद्यालयातील सर्व संस्थाचालक, प्राचार्य, संचालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवी संस्थेतील कार्यकर्ते आणि माजी आजी विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी भरभरून हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# लोकन्यायालयांमध्ये ८१० दावे निकाली



**पालघर/प्रतिनिधी**

लोकन्यायालयाच्या माध्यमातून अधिक काळापासून निकालाच्या प्रतीक्षेत असलेले दावे, तसेच दखलपूर्व ८१० दावे निकालात काढण्यात आले आहेत. अपर जिल्हा व सत्र न्यायालय, पालघर येथे लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. लोकन्यायालयाच्या माध्यमातून काही काळापासून निकालाच्या प्रतिक्षेत असलेले दावे ४६० तसेच दाखलपुर्व दावे ३५० असे एकूण ८१० दावे निकालात काढण्यात आले आहेत. दीर्घकाळ निकालाच्या प्रतिक्षेत असलेल्या दाव्यामध्ये चेंक बाउन्सच्या केसेस, डोमेस्टिक व्हायलन्स, विवाह याचिका, मोटार अपघात, प्राधिकरणानाकडील दावे, दिवाणी दावे निकाली काढण्यात आले. तसेच दाखलपुर्व प्रकरणांमध्ये ग्रामपंचायतीचे पाणीपट्टी व घरपट्टी याची थकबाकी व बँक, विज वितरण कंपनीचे दाखलपूर्व प्रकरणे निकाली काढण्यात आले. मा. विधी सेवा प्राधिकरण, ठाणे व मा.विधी सेवा, पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने व मा. जिल्हा न्यायाधीश तथा पालघर तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष, डी.एच. केळुसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाच पॅनल प्रमुखांनी लोकन्यायालयाचे कामकाज पाहिले. यामध्ये पालघरचे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश एस.डी. दाभाडे, सर्वश्री सहदिवाणी न्यायाधीश ए.ए. चेंडके, खंदारे, एक.ए.काळे, एस.एच.तेलगांवकर यांचा समवेश होता.

# तडवळ येथे हातभट्टी दारु निर्मिती केंद्रावर धाड



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील तडवळ येथे अवैध हातभट्टी दारू बनविणाऱ्या कारखान्यावर दक्षिण पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी धाड टाकून ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करून तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी ऑपरेशन परिवर्तन ही मोहीम जिल्हाभर राबवली जात आहे. त्या मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. तडवळ येथील हिंदुस्तान पेट्रोलियम पेट्रोल पंपाच्या पाठीमागे आरोपी रमजान नबीलाल मुल्ला यांच्या शेतात आरोपी दशरथ फत्तुसिंह राठोड हा गुळ मिश्रित रसायन टाकून मानवी जीवितास हानिकारक हातभट्टी दारू तयार करून विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याला मिळाली होती. त्यानुसार अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्या ठिकाणी पोलिसांनी धाड टाकली असता याठिकाणी दारू विकणारी महिला आरोपी वालुबाई फत्तुसिंह राठोड ही आढळून आली. त्यांच्याकडून ९० हजारांचे गुळ मिश्रित रसायन, पंधरा प्लॅस्टिक बॅरल, युरिया सल्फेट, हातभट्टी दारू, नवसागर असा एकूण ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करून तिघांवर अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब काकडे हे करीत आहेत.

# सोलापूर ग्रामीण पोलिसांचे परेड संचलन; विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी दिले रिवॉर्ड



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या परेड कमांडरच्या अधिपत्याखाली गुरुवारी सकाळी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर झालेल्या ग्रामीण पोलिसांच्या परेड संचलनात उत्कृष्ट गुड मॉर्निंग, उत्कृष्ट परेड मार्जिन, सारे काही अपडेट पाहून भारावलेल्या कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी संपूर्ण परेड संचलनावर रिव्हार्डस आणि प्रमाणपत्राची घोषणा केली. मनोज लोहिया हे ग्रामीण पोलीसच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी सोलापूरच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर परेड संचलन आयोजित केले होते या संचलनाचे नेतृत्व पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण सहा प्लाटून तयार करण्यात आले होते. अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा डॉ विशाल हिरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज डॉ शिवपुजे, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विक्रम कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर तालूका भारती, पोलीस उपनिरीक्षक प्रणोती यादव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील या सहा अधिकाऱ्याने नेतृत्व केले होते. विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी याप्रसंगी १४ अधिकारी व १८७ पोलिसांना रिव्हार्डस आणि प्रमाणपत्राची घोषणा केली त्यानंतर संपूर्ण पोलीस दलात आनंदाचे वातावरण दिसत होते.

# नागेश आर्केस्ट्रा बारवर विशेष पथकाचा छापा

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर विजयपूर रस्त्यावरील सोरेगाव येथील नागेश आर्केस्ट्रा अँड बारवर सोलापूर शहर पोलीस आयुक्त यांच्या विशेष पथकाने दोन महिन्यात दुसऱ्यांदा छापा टाकला असून १५ आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ३ लाख ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बार मालकाचा मुलगा सुनील संगमेश्वर सुरगीहळ्ळी, व्यवस्थापक शंकर रघुनाथ दुपारगुडे, सुभाष सूर्यकांत कुरले, साऊंड सिस्टम चालक मंजुनाथ सुखदेव जाधव, वेटर दीपक किसन चव्हाण, दशरथ श्रीशैल शिंदे, ग्राहक अविनाश विजयकांत भरले, इक्बाल आयुब बागवान, इब्राहिम फारुक बागवान, गणेश लक्ष्मण गायकवाड, अनिकेत मलकप्पा बिजनूर, राहुल दत्तात्रय जाधव, विश्वेश्वर नामदेव कमळे, काशिनाथ शंकर गायकवाड, श्रीनिवास सेतुमाधव पाटील यांच्याविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी रात्री नागेश आर्केस्ट्रा अँड बार या ठिकाणी अश्लिल नृत्य करीत असलेल्या महिलावर पैसे उडवून त्यांना प्रोत्साहित करीत असताना आढळून आले. १५ आरोपींना ताब्यात घेऊन एकूण ३ लाख ७७ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर पोलीस आयुक्त हरीश बैजल यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे, दिलीप भालशंकर, शिलावती काळे, योगेश बर्डे, वाजिद पटेल, संजय साळुंखे, नरेंद्र नक्का यांनी केले आहे.

# जालनाच्या चोरट्यास व सराफास अटक

**सोलापूर/प्रतिनिधी**




सोलापूर येथील सराफ दुकानफोडी उघडकीस आणण्यात जोडभावी पेठ पोलिसांना यश आले असून जालन्याच्या चोरट्यास व सराफासचा अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून ८ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सराफ बाजारातील रामकृष्ण रेवणकर यांची सराफी दुकान फोडून चोरट्यांनी ऐवज लंपास केला होता. तपासा दरम्यान आरोपींनी सराफ दुकानात चोरी करण्यासाठी चारचाकी वाहनांचा उपयोग केल्याचे निष्पन्न झाले होते हे चार चाकी वाहन जालनाच्या दिशेने गेल्याची माहिती पोलीस पथकाला मिळाली होती. त्यानुसार भारतसिंग कपूरसिंग बावरी याला जालना येथून ताब्यात घेऊन त्याची पोलिसांनी चौकशी केली असता सदरचा गुन्हा त्याने त्याच्या दोन साथीदारांनीच्या मदतीने केले असल्याचे कबूल केले. चोरी करण्याकरिता त्यांनी औरंगाबाद जिल्ह्यातून चारचाकी वाहन चोरल्याचे सांगितले. त्याने चोरलेल्या चांदीचे दागिने पैकी काही दागिने हस्तगत केले आहेत. काही चांदीचे दागिने हे त्याने जालना येथे राहणारा सोनार राहुल वडगावकर यास विक्री केल्याचे सांगितले. पोलिसांनी सोनाराला ही अटक केली आहे. पोलिसांनी बावरी याला विश्वासात घेऊन विचारणा केली असता त्याने व त्याचे दोन साथीदार संजीवसिंग कृष्णासिंग भादा, दीपकसिंग प्रल्हादसिंग टाक यांनी वाशीम जिल्ह्यात सराफ बाजारात चोरी केल्याची कबुली दिली आहे. सदर गुन्ह्यात चोरीस गेलेले दागिने पैकी दहा किलो ३४८ ग्रामचे चांदीचे दागिने व चार चाकी वाहन (एमएच २० बीएन २६४१) असा पावणे नऊ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त हरीश बैजल, पोलीस उपायुक्त वैशाली कडूकर, सहाय्यक पोलीस आयुक्त माधव रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब भालचीम, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक केतन मांजरे तसेच आबा थोरात, सरोजी शिंदे, अतुल गवळी आदींनी केली आहे.

# चाकूर नगर पंचायत, सार्वत्रिक निवडणूक २०२१ चा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**लातूर/प्रतिनिधी**

मा.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र राज्य, यांचे पत्र दि. २४ डिसेंबर २०२१ चे आदेशान्वये चाकूर नगर पंचायत, सार्वत्रिक निवडणूक २०२१ च्या होणा-या निवडणूकी संदर्भात सविस्तर आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी निवडणूक निर्णय अधिकारी, चाकूर नगर पंचायत, चाकूर यांच्या कार्यायात आढावा बैठक घेतली. या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण निवडणूक प्रक्रियेची माहिती घेतली व नागरीकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेले प्रभाग क्रं.५,८,१३,१४ संदर्भात मा.निवडणूक राज्यआयोग यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन निवडणूक आचारसहिंता बाबत मार्गदर्शन करुन शहरातील मतदान केंद्राची पहाणी करुन दि.२१ डिसेंबर २०२१ रोजी होणारे मतदानाची टक्केवारी वाढविणेसाठी मतदारमध्ये जनजागृती करणेस आदेशीत करुन निवडणूका या पारदर्शक व सुव्यस्थित पारपाडणे या बाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्रविण फुलारी, निवडणूक निर्णय अधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी, अहमदपूर, यांनी माहिती दिली की, १७ प्रभागा करीता ११५ नामनिर्देशनपत्र प्राप्त झालेली होती. तथापी राज्य निवडणूक आयोग यांचे आदेश दि. ०७ डिसेंबर २०२१ अन्वये नागरीकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेले प्रभाग क्रं.५,८,१३,१४ या सर्व जागासाठीचे निवडणूक प्रक्रिया आहे. त्या टप्प्यावर तात्काळ स्थगिती करण्यात आलेली आहे. उर्वरीत १३ प्रभागासाठी नियोजित कार्यक्रमानुसार प्रकिया राबविण्यात येत आहे. नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या अंतीम मुदतीपर्यंत एकूण १६ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे मागे घेतली त्यामुळे १३ जागांसाठी अंतीमरित्या ५८ उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. त्याकरीता २३



मतदान केंद्र निश्चित केले आहेत. व निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व सुव्यस्थितिरत्या पारपाडण्यासाठी आवश्यक तो पोलीस बदोंबस्त व अधिकारी/ कर्मचारीयांचे पथक तयार केलेले आहेत. या निवडणुकासंदर्भात आजपावेतो झालेल्या निवडणूक प्रक्रियेसंबधी जिल्हाधिकारी यांनी या निवडणूक संदर्भात १३ मतदान क्रेंदाचा आढावा घेत आवश्यक मतदान केंद्राची निवड, मतदान केंद्रनिहाय मतदान, मतदारांची एकूण संख्या, मतदान केंद्रावर दिल्या जाणा-या सोयीसुविधा विशेषतः वृध्द, अपंग व गरोदर स्त्रीया यांच्यासाठी आवश्यक असणा-या सुविधाचा तपशील जाणून घेतला त्याच बरोबर जिल्हाधिकारी या निवडणूकी संदर्भात मतदार यादी, आचार संहिता,कायदा व सुव्यस्था, संवेदनशील किंवा अतिसंवेदनशील मतदार केंद्राची माहिती व मद्य विक्रीबंदी, शस्त्र जमा करणे, मतदानाची कार्यवाही दरम्यान आवश्यक असणारा पोलीस बंदोबस्त, मतदान यंत्राचा तपशील, मतदान केंद्रनिहाय अधिकारी / कर्मचारी यांचे प्रशिक्षण, मतदार जागती मोहिम, मतमोजणी करीताचे प्रशिक्षण साहित्य उपलब्धता बाबतचा सविस्तर आढावा घेवून समाधान व्यक्त केले. याचवेळी ईव्हीएम सिलींग प्रकियेची पहाणी करुन ईव्हीएम सुरक्षेतेसाठी करण्यात आलेल्या स्ट्राँग रुमची पहाणी उपलब्ध असणा-या सोयी- सुविधांचा आढावा घेवून आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी चाकूर नगर पंचायतचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रविण फुलारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ. शिवानंद बिडवे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, अजिंक्य रणदिवे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत, चाकूर तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत

### सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रलंबित मागणीसाठी मुख्यमंत्र्यांना साकडे

लातूर : वाढत जाणारी महागाई आणि सन २०१२ पासून राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे विविध प्रलंबित प्रश्न आजही जैसे थे असल्यामुळे आर्थिक कोंडीत सापलेल्या सार्वजनिक ग्रंथालयापुढे प्रचंड संकट निर्माण झाली असून, या प्रलंबित मागण्यासंदर्भात महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत आदींना निवेदन सादर करुन या मागण्याची सोडवणूक करण्याची मागणी केली आहे. राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयात वर्षानुवर्षे तुटपूंज्या वेतनावर काम करणार्या जवळपास २५ हजार ग्रंथालय कर्मचार्यांना पत्की समितीच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी, सेवाशर्ती, सेवानियम, सेवाशाश्वती विनाविलंब मंजूर करावी, सन २०१२ पासून ठप्प असलेल्या परिरक्षण अनुदानात तिप्पट वाढ करावी, सन २०१२ पासून नवीन ग्रंथालयांना शासन मान्यता बंद असून, ग्रंथालयाच्या नैसर्गिक वाढीसाठी वर्गबदल, नवीन ग्रंथालयांना शासन मान्यता द्यावी, राज्य ग्रंथालय परिषदेची पुनर्रचना करण्यास मंजूरी द्यावी,तसेच विविध गठीत झालेल्या समित्यांनी सूचविलेल्या शिफारशींना मंजूरी द्यावी आदी मागण्यांचा या निवेदनामध्ये समावेश करण्यात आला आहे. सदरील निवेदन महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.रामेश्वर पवार व प्रमुख कार्यवाह डॉ.गजानन कोटेवार यांनी सरकारकडे सादर केले आहे.

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत दि. १६ डिसेंबर २०२१ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते दि. ३१ डिसेंबर २०२१ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तींचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

### निलंगा येथील कलावती तोरंबे यांचे निधन



निलंगा : स्व. दिलीपभाऊ पाटील निलंगेकर नागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक नागोराव तोरंबे यांच्या पत्नी कलावती तोरंबे यांचे अल्पशः आजाराने निधन झालेले आहे. त्यांच्या पार्थिवावर त्यांचे मूळगाव मुदगड एकोजी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पतसंस्थेतील अधिकारी कर्मचार्यांसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनामुळे तोरंबे परिवाराची मोठी हानी झालेली असून त्यांच्या आत्म्यास शांती लाभावी अशी श्रध्दांजली यावेळी वाहण्यात आली.

### शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सचिन पाटील याची निवड

औसा : औसा तालुक्यातील हिप्परसोगा येथे शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सचिन पाटील यांची सलग तिसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. शासकीय निर्देशानुसार शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आले. गावच्या सरपंच श्रीमती कविता कांबळे,तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष विठ्ठल सोमवंशी,पोलीस पाटील बालाजी कांबळे,समाधान कांबळे यांच्यासह पालकांच्या उपस्थितीत ही निवड संपन्न झाली.समितीच्या उपाध्यक्ष म्हणून श्रीमती प्रियंका कांबळे तर सदस्य म्हणून मारोती चेवले,श्रीमती सरिता चिंचोले, श्रीमती कविता आळंदकर, श्रीमती मंजुषा बोंबिले, श्रीमती रेशमा कांबळे, तुकाराम सुकरे,श्रीमती आरती पाटील,विलास आळंदकर,ज्ञानेश्र्वर सोमवंशी, समाधान कांबळे यांची निवड करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक डी. एस.बनसोडे व शिक्षकांची उपस्थिती होती.

### महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष चंद्रकांत हंडोरे यांची विलास बागेला भेट

लातूर : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष तथा माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे यांनी आज शनिवार दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील विलास बागेत येथे जाऊन लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेऊन त्यांना विनम्र अभिवादन केले. यानंतर माजी मंत्री तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष चंद्रकांत हंडोरे यांनी बाभळगाव येथील निवासस्थानी राज्याचे वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतीक कार्य मंत्री तथा लातूर जिल्हा पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांची भेट घेतली, यावेळी त्यांच्या समवेत सामाजिक तसेच राजकीय विषयांच्या अनुषंगाने चर्चा केली, आमदार धीरज देशमुख उपस्थित होते. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे, शशिकांत बनसोडे, मोहन माने, संपत लगाडे, सचिन दाताळ, गौतम ढोबळे, प्रवीण पाटील, एकनाथ पाटील, ॲड. बाबासाहेब गायकवाड, रत्नदीप आजनीकर, प्रा.ओमप्रकाश झुरळे, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, सचिन मस्के, अशोक नाडगोंडे गणपत भाडुळे, बाबुराव देशमुख, कुमार कोडतोडीकर, संजय काळे, युसुफ शेख, शंकर ढोबळे आदीसह काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, उपस्थित होते.

क्राईम Reporter

क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉलवर उपलब्ध होईल.

9 8 9 0 7 1 8 8 7 3

# ओबीसींची शोकांतिका!

महाराष्ट्रात ओबीसी समाज इतरांच्या तुलनेत खूप मोठा आहे. असे असतानाही या समाजाला आता ओबीसी म्हणून राजकीय प्रतिनिधित्व करता येणार नाही. कारण सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींच्या राजकीय आरक्षण रद्द केले आहे आणि ते पुन्हा मिळवण्याचा महाराष्ट्र सरकारचा प्रयत्न सर्वोच्च न्यायालयात अपयशी ठरला आहे. त्यामुळे काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या मुंबईसह १८ महानगर पालिकांच्या निवडणुकीत ओबीसींसाठी राखीव प्रभागांचा असणार नाही. परिणामी ओबीसीवर खुल्या प्रभागात निवडणूक लढवण्याची नामुष्की ओढवली आहे. पण तिथे जबरदस्त स्पर्धा असल्याने खुल्या प्रभागात ओबीसी उमेदवार निवडून येणे वाटते तितके सोपे नाही. थोडक्यात ओबीसी समाजाची राजकीय हत्या करण्यात आली आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. आणि याला कारणीभूत स्वतः ओबीसीच आहेत! अठरापगड जातीत विभागलेला ओबीसी समाज स्वतःचे वेगळे अस्तित्व दाखवण्यात आपल्याच अहंकारामुळे असफल ठरला आहे. आज ओबीसी सर्वच राजकीय पक्षांमध्ये विभागला गेला आहे. आणि त्याचा फायदा त्यात्या पक्षांना मिळत आहे. म्हणूनच प्रत्येक पक्ष ओबीसीसाठी लढण्याचे नाटक करीत आहे आणि गरीब बिचारे ओबीसी या नाटकाला वास्तव समजून त्यच्या मागे फरफटत चालले आहेत. म्हणूनच त्यांची आज परवड सुरू आहे. पण गेल्या अनेक वर्षात ओबीसी समाजाची जात निहाय जनगणना कधी झालीच नाही आणि ती व्हावी यासाठी कुठल्याही पक्षाने प्रयत्न केले नाहीत. ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाने इंपेरिकल डेटा मागितला आहे. आणि त्याच्यावरून राज्य आणि केंद्र सरकारमध्ये गेल्या कित्येक महिन्यांपासून घाणेरडे राजकारण सुरू होते. अखेर बुधवारी सर्वोच्च न्यायालयात केंद्राने सांगून टाकले की आमच्याकडे असलेला डाटा सदोष आहे तो देता येणार नाही. त्यामुळे केंद्राकडून इंपेरिकल डेटा मिळण्याची महाराष्ट्र सरकारची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. आता प्रश्न असा येतो की केंद्राकडे असलेला ओबीसींचा डेटा जर सदोष होता तर इतके दिवस केंद्राने तो पूजेला लावला होता का? कारण आज ना उद्या त्याची मागणी होणार हे केंद्राला सुद्धा ठाऊक होते. मग त्या सदोष डाटा मध्ये केंद्राने का नाही सुधारणा केली. आणि इथे जे भाजप वाले ओबीसी आरक्षणासाठी आंदोलन करीत आहेत. त्यांना या सगळ्या गोष्टी ठाऊक नव्हत्या का? ओबीसी समाजाने या सगळ्या गोष्टींचा बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. आज राजकीय आरक्षण गेले, उद्या नोकऱ्या आणि शिक्षणात असलेले २७ टक्के आरक्षण सुद्धा जाईल. त्यासाठी तुमच्या सोबत असल्याचा देखावा करणारेच प्रयत्नशील आहेत हे अजूनही ओळखा आणि सावध व्हा! महाराष्ट्रात ब्राह्मण, मराठा आणि वाणी यासारखे जे उच्च वर्णीय आहेत. त्यांची मानसिकता अजूनही वर्ण व्यवस्थेच्या भोवती घुटमळत आहे. त्यामुळे त्यांना दलीत, भटके विमुक्त, आदिवासी आणि ओबीसी मधले साळी, माळी, कोष्टी, कुणबी, सुतार, लोहार यांना कुठल्याही परिस्थितीत आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या वरचड होऊ द्यायचे नाही, म्हणूनच ओबीसी आरक्षण कायद्याच्या चक्रव्यूहात कसे अडकेल यासाठी प्रयत्न केले जात आहेत. म्हणूनच ओबीसींनी वेगवेगळ्या पक्षाचे राजकीय झेंडे फेकून ओबीसी म्हणून एकच एक झेंडा हाती घेणे गरजेचे आहे. तसे झाले तरच ओबीसींना त्यांचा न्याय हक्क मिळू शकतो. त्यासाठी ओबीसी समाजाने आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे सर्व ओबीसी म्हणजे मराठा ही खुळचट समजूत डोक्यातून काढून टाकायला हवी. मराठा मोर्चाच्या आंदोलनात ओबीसी समाज आपण मराठा आहोत, त्यामुळे मराठ्यांना मिळणारे १६ टक्के आरक्षण हे आपल्यालाच मिळणार आहे असा जो समज करून घेतला आहे तोच मुळात चुकीचा आहे आणि मराठा म्हणजेच ओबीसी असे जर असेल तर मग ओबीसी स्वतःसाठी वेगळे आरक्षण का मागत आहेत? तसेच मराठा मोर्चाचे नेते न्यायालयीन लढाईत आपल्याशी ठरल्यानंतर आम्हाला ओबीसींचा कोट्यातून आरक्षण द्या असे का सांगत आहेत? ओबीसी आरक्षण नवा दलीत समाजाने कधीही मराठा आरक्षणाला विरोध केला नाही. उलट प्रकाश आंबेडकर यांच्या सारखे दलीत नेते मराठा आरक्षणासाठी मराठा समाजाच्या खांद्याला खांदा लावून लढत आहेत. मराठा मोर्चात निम्मे आंदोलनकर्ते हे ओबीसी मधील विविध जातीतले आहेत. आणि आपण मराठा आहोत त्यामुळे मराठ्यांना मिळणारे आरक्षण हे आपल्यालाच मिळणार आहे असा त्यांनी गैरसमज करून घेतला आहे. भुजबळ किंवा वडेट्टीवार यांच्यासारख्या नेत्यांनी ओबीसी समाजात असलेला हा गैरसमज कधी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे का? कधीच नाही! कारण तसे केले तर मराठा समाज दुखावला जाईल त्यांच्या पक्षापासून दूर जाईल आणि त्यातून पक्षाचे राजकीय नुकसान होईल. पवार सारखे पक्षप्रमुख दुखावले जातील, या सगळ्या गोष्टीमुळे विविध पक्षातील ओबीसी नेते गप्प आहेत आणि त्यामुळेच आपण नेमके कोण आहोत, याबाबत संभ्रमित झालेला ओबीसी समाज आज भरकटला आहे. परिणामी आपले ओबीसी म्हणून राजकीय अस्तित्व गमावण्याची त्यांच्यावर पाळी आली आहे. म्हणूनच ओबीसी समाजाचे खरे मारेकरी कोण असतील तर ओबीसींना ओबीसी म्हणून एकत्र यायला न देणारे ओबीसी नेतेच. ओबीर्सींचा राजकीय आरक्षणाचे खरे मारेकरी आहेत. कारण ओबीसी आणि ब्राह्मण, मराठा व वैश्य हे वेगवेगळे आहेत हे वास्तव त्यांनी ओबीसींना कधी पटवून दिलेच नाही. त्यामुळे वेगवेगळ्या जातीत विभागलेला ओबीसी समाज ओबीसी म्हणून कधी एकत्र होऊच शकला नाही आणि हीच ओबीसी आरक्षणाची खरी शोकांतिका आहे. जे सत्य आहे ते आणि इथे मांडत आहोत. वास्तविक पुरोगामी महाराष्ट्राला जातीपातीचे राजकारण मान्य नाही. पण आरक्षणाच्या मुद्यावरून ज्या भिंती उभ्या केल्या जात आहेत त्या महाराष्ट्राचे किती आणि कसे नुकसान करीत आहेत, हे प्रत्येकाला कळायला हवे. छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीही कुणाची जात धर्म पाहिला नाही, जो महाराष्ट्रासाठी जगेल जो महाराष्ट्रासाठी मरेल तो माझा मावळा. मग तो ब्राह्मण असो की दलीत अथवा मुस्लिम असो सगळ्यांना महाराजांनी आपले मानले. म्हणूनच त्यांना हिंदवी स्वराज्याची पताका बांधता आला. आजचे राज्यकर्ते हाच इतिहास विसरले म्हणू महाराष्ट्राची अधोगती सुरू आहे. निवडणूक आयोगाने ओबीसी आरक्षण शिवाय पंचायत समितीच्या निवडणुका घेण्याचे ठरवले आहे. त्यामुळे आता ओबीसींना या निवडणुकीत खुल्या प्रवर्गातून निवडणुका लढवाव्या लागणार आहेत. पण ओबीसीसाठी या निवडणुका जिंकणे वाटते तितके सोपे नाही. आता इंपेरिकल डेटा खरोखरच सरकारला तीन महिन्यात गोळा करणे शक्य आहे का? कारण त्यासाठी लागणारे मनुष्यबळ, वेळ पैसा या सगळ्या गोष्टींचा ताळमेळ बसायला हवा तरच हे शक्य आहे. या सगळ्यात एक गोष्ट संशयास्पद वाटतेय ती म्हणजे कुणीतरी एक मोठा घटक आहे, ज्याला ओबीसींना आरक्षण मिळू नये असे वाटत आहे आणि हा घटक सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये सुद्धा छुप्या पाढतने काम करतोय.ओबीसी आरक्षणात भाजपची भूमिका सुरवातीपासूनच संशयास्पद होती आणि आता केंद्राने सर्वोच्च न्यायालयात जे काही प्रतिज्ञापत्र त्यात त्यांनी जे म्हटले आहे की आमच्याकडच्या डेटा सदोष आहे. मग तो सदोष डेटा सुधारावा असे त्यांना अजूनही का वाटले नाही. सरकारकडे जर काही चुकीची माहिती असेल तर ती त्यांनी दुरुस्ती करायला हवी, पण त्यांना ओबीसीचे काही घेणे देणे नसल्याने तो सदोष डाटा त्यांनी तसाच आपल्याकडे ठेऊन दिला ही एक प्रकारे ओबीसीची फसवणूक नाही का? आणि ही गोष्ट इथल्या ओबीसीसाठी आंदोलन करणाऱ्या भाजपवाल्यांना दिसत नाही का? हा सगळा प्रकार ओबीसीची दिशाभूल करणारा असून यात सगळेच सामील आहेत आणि म्हणूनच ओबीसी समाजाला जर आता काही मिळवायचे असेल तर त्यांनी स्वतःच्या ताकदीवर आणि हिमतीवर मिळवायला हवे नाही तर आहे ते सुद्धा जाईल!

# बेटी बचावला पाठबळ!

केंद्रातील मोदी सरकारची आजवरची काही कामे भलेही वादग्रस्त असली तरी त्यांच्या सरकारने मागील सात वर्षात घेतलेले काही निर्णय निश्चितच समाजासाठी लाभदायी ठरलेत. मग तो जम्मू काश्मीर मधील कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय असो की ट्रीपल तलकचा निर्णय असो! त्याचा निश्चितच देशातील जनतेला कुठेतरी फायदा होणार आहे. सरकारने असाच आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे आणि तो म्हणजे बाल विवाह कायद्यात सुधारणा करून मुलींचे लग्नाचे वय १८ वरून २१ वर्ष करण्याचा! भारतीय संस्कृती आणि जुनाट रूढी परंपरामध्ये स्त्रीवर अन्यायच झालाय. तिला चूल आणि मुल यात अडकवून ठेवण्यात आले होते. आणि सगळ्यात जर भयंकर काय असेल तर एखाद्या आठ नऊ वर्षाच्या कोवळ्या बालिकेचा बालविवाह तोही कुठल्या तरी वयस्कर माणसाबरोबर लावला जायचा. त्यामुळे त्या बालिकेच्या आयुष्याची होळी व्हायची. ज्याच्याशी त्याचे लग्न व्हायचे तो तिला कोवळ्या वयात कुस्करून टाकायचा. तिचे लैंगीक शोषण सुरू असतानाच पुढे दोन-तीन वर्षात तिला मासिक धर्म सुरू झाला की तिच्यावर अकाली मातृत्व लादले जायचे. लहान वयात गर्भधारणा झाल्यास गर्भाशय कमजोर होऊन स्त्रीला पुढे वेग वेगळ्या व्याधींना तोंड द्यावे लागायचे आणि लग्नाची ती बायको लहान वयातच शारीरिक दृष्ट्या कमजोर झाली की मग पुरुष पुन्हा कुठल्या तरी कोवळ्या मुलीला लग्न करून घरात आणायला मोकळा असे सगळे दुष्टचक्र सुरू होते. वास्तविक लग्न हा आयुष्यातला एक महत्वाचा टप्पा असतो. त्यामुळे लग्नासाठी स्त्री असो की पुरुष त्यांची मानसिक आणि शारीरिक क्षमताही विचारात घेणे गरजेचे असते. खास करून स्त्रीच्या बाबतीत याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. कारण गर्भधारणेसाठी तिची शारीरिक क्षमता असणे गरजेचे असते. कारण बाळंतपण आणि प्रसूती नंतर स्त्रीचा दुसरा जन्म होतो असे म्हणतात ते काही खोटे नाही. कारण नऊ महिन्याचा तो काळ स्त्रीसाठी एकप्रकारचे अग्निदिव्य असते. म्हणूनच लग्नाचे वय किमान २० वर्ष तरी असावे अशी मागणी केली जात होती ती अखेर सरकारने मान्य केली असून मुलीचे लग्नाचे वय यापुढे २१ वर्ष इतके असावे असा सरकार कायदा करणार आहे. त्यासाठीचे एक विधेयक तयार करण्यात आले असून केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्याला मंजुरीही मिळाली आहे आता याच अधिवेशनात हे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर करून घेतले जाईल. हे विधेयक जेंव्हा संसदेत मंजुरीसाठी येईल तेंव्हा विरोधकांनी त्याचे राजकारण करू नये. तर सामाजिक जबाबदारी समजून ते मंजूर करण्यास मदत करावी. आपल्याकडे सध्या स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने काम करण्याचा हक्क आहे. महिलांचा विकास आणि सुरक्षेसाठी बेटी बचाव बेटी पढाओ यासारखे महत्वकांक्षी अभियान चालवले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुलीचे लग्नाचे वय २१ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अर्थात सरकारचा हा निर्णय किती जरी चांगला असला तरी तो कितपत यशस्वी ठरेल याची शाश्वती नाही. कारण पालकांना भीती असते की आपली मुलगी वयात आल्यावर तिचे कुठेतरी वाकडे पाऊल पडले तर समाजात आपली बदनामी होईल. त्यामुळे काही पालक मुलींचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत सुद्धा थांबत नाहीत. अगदी सोळा-सतरा वर्षाची झाली की तिचं लग्न करून टाकतात. कारण त्यांच्या मते मुलीचं सोळावं वरीस धोक्याच असतं. अर्थात त्यांच्या मनातील ही भीती काही चुकीची नाही. कारण आजकाल शालेय जीवनापासूनच प्रेम प्रकरणे सुरू होतात. आणि त्यातून शरीर संबंध निर्माण होतात. त्यातच आजकाल गर्भनिदान चाचणी आणि गर्भपात करणे कायद्याने गुन्हा ठरत असल्याने जर पंधरा सोळाव्या वर्षी प्रेम संबंधातून मुलगी गर्भवती राहिली, तर तिचा गर्भात करणे खूप कठीण असते. या सगळ्या गोष्टींचा आणि खास करून स्त्रीच्या शारीरिक क्षमतेचा विचार करूनच केंद्र सरकारने हा निर्णय घेतलाय. या निर्णयामुळे मुलींना त्यांचं लग्नापूर्वी शिक्षण पूर्ण करणे आणि स्वावलंबी बनणे शक्य होणार आहे. कारण आजकाल लग्नाच्या बाजारात नोकरदार मुलींना अधिक पसंती आहे, म्हणूनच लग्नाचे जे २१ वय केले जाणार आहे. त्याचे सर्वांनी स्वागत करायला हवे.




**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# ऑनर किलिंग : देशावरील काळा डाग!

**(ऑनर किलिंगच्या बातम्या सातत्याने माध्यमांमध्ये येत आहेत. या घटनांचे पडसाद आपल्याला सोशल मीडियावरसुद्धा उमटताना दिसत आहेत. सध्या महाराष्ट्र ऑनर किलिंगच्या प्रकरणामुळे हादरला आहे. औरंगाबादच्या वैजापूर तालुक्यातील गोयेगावमध्ये खोट्या प्रतिष्ठेपायी आई आणि भावानेच आंतरजातीय विवाह केल्यामुळे तरुणीचं शीर धडावेगळं करत तिची हत्या केल्याचा गंभीर प्रकार घडला आहे.)**

**दिशायन**

ऑनर किलिंग अर्थात कुटुंबाच्या तथाकथित मानसन्मानासाठी कुटुंबाच्याच पुढच्या पिढीला संपवणं, त्यातही मुलींना मारणं, हा त्यातलाच एक पाशवी प्रकार! आंतरजातीय विवाह आणि त्यामुळे होणाऱ्या ऑनर किलिंगच्या प्रकारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. ग्रामीण-शहरी, अशिक्षित-सुशिक्षित असा कोणताही भेदभाव न मानता या घटना घडत आहेत. पूर्वी फक्त उत्तर भारताच्या राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, बिहार अशा राज्यांमध्ये प्रामुख्याने घडणाऱ्या या घटना आता मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक, इतकंच काय, सर्वात साक्षर मानल्या जाणाऱ्या केरळमध्ये देखील घडू लागल्या आहेत. आता याचं स्वरूप फक्त एक गुन्हा, त्यातला/त्यातली पीडित, गुन्हेगार आणि त्यांना शिक्षा देणारी न्याययंत्रणा इतकंच राहिलं नसून एक समाज आणि व्यापक अर्थानं सध्या पृथ्वीवर अस्तित्वात असलेली सर्वात हुशार अशी सजीव जात असलेल्या मानवजातीविषयी काही गंभीर प्रश्न उपस्थित करणारी बाब आहे.

**जात आणि पुरुषी अहंकाराची जोडगोळी**

घरातल्या मुलाने किंवा मुलीने दुसऱ्या विशेषत: त्यांच्या लेखी खालच्या जातीच्या मुलाशी किंवा मुलीशी लग्न केलं म्हणजे आपल्या जातीचा, कुटुंबाचा, पिढीजात पितरांचा घोर अपमान केला, असं मानून या हत्या किंवा हल्ले होतात. पण दुसऱ्या जातीत लग्न केलं म्हणून होणारा कथित अपमान किंवा नष्ट होणारी मानमर्यादा त्याच कुटुंबप्रमुखानं हत्येसारखं भीषण कृत्य केल्यामुळे टिकून राहील का? आंतरजातीय विवाह हा दुसऱ्याची हत्या करण्यापेक्षाही गंभीर गुन्हा आहे का? की आपल्या इच्छेनुसार लग्न न करणाऱ्या मुलांचा जीव घेणं आता सोपं वाटू लागलं आहे? खरंतर ही प्रत्येक हत्या या देशातल्या कथित कायद्याच्या राज्याच्या कानशिलात लगावलेली चपराक ठरावी. या सगळ्याच्या मुळाशी आहे ती जात! २००६मध्ये लता सिंग विरूद्ध उत्तर प्रदेश सरकार या केसमध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्टपणे नमूद केलं होतं की, जातव्यवस्था हा देशाला लागलेला एक कलंक आहे. जितक्या लवकर आपण ती नष्ट करू, तितकं आपल्यासाठी चांगलं आहे. उलट आंतरजातीय विवाह जातीभेद नष्ट करण्यासाठी उपयोगीच ठरत आहेत.' २०१८मध्ये देखील सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात ऑनर किलिंगवर ताशेरे ओढले होते. जेव्हा सज्ञान तरूण आणि तरूणीने स्वखुशीने लग्न करण्याचा निर्णय घेतला असेल, तेव्हा त्यांच्या कुटुंबियांच्या, त्यांच्या समाजाच्या किंवा त्याच्या जातीच्या परवानगीची कोणतीही आवश्यकता नाही. त्यामुळे यापैकी कुणीही किंवा जात पंचायतीने त्यांना रोखण्याचा, धमकावण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न केल्यास तो गुन्हा ठरेल', असं न्यायालयानं स्पष्ट केलं होतं. कायदेशीरदृष्ट्या इतकी स्पष्टता असून देखील ही वृत्ती कमी होण्याऐवजी वाढत चालली आहे.

भारतात असलेली पितृसत्ताक पद्धती आणि त्यातून निर्माण होणारी पुरुषी अस्मिता या सगळ्याच्या केंद्रस्थानी असते. मनोविकार तज्ज्ञ डॉ. आदिती



आचार्य यांच्यामते, 'पितृसत्ताक पद्धतीमुळे घरातल्या महिलांनी आपल्या कह्यात राहावं अशी पुरुषांची धारणा असते. आपल्या इच्छेविरूद्ध मुलीने दुसऱ्या जातीच्या मुलाशी लग्न केलं, तर त्यांच्या अस्मितेला ठेच लागते. त्यातच समाजातल्या याच मानसिकतेच्या इतर पुरुषांकडून आणि त्यांच्या दबावाखाली आलेल्या स्त्रियांकडूनही जेव्हा जातीच्या आधारावर अशाच प्रकारची अवहेलना होऊ लागले, तेव्हा त्या अस्मिता अहंकाराचा स्फोट होतो आणि त्याचं पर्यवसान हत्येसारखं गंभीर पाऊल उचलण्यात होतं. कुठेतरी छुप्या किंवा उघड असणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीशिवाय हे होत नाही'. त्यामुळे समाजातला पुरुषी अहंकार आणि त्याच्या जोडीला भीषण आणि कट्टर जातीव्यवस्था या समस्येच्या मुळाशी आहेत.

**जातीचं टोकाचं रुप...**

बीडमधल्या सामाजिक कार्यकर्त्या मनीषा तोकले यांच्या मते, या प्रकारच्या घटनांसाठी जातीय मानसिकता कारणीभूत आहे. आपल्याकडे जातीय मानसिकता प्रबळ होत चाललीये. कारण जातीमुळे येणारी आर्थिक, सामाजिक, मानसिक ताकद हातातून निसटेल, अशी भीती यामागे असते. यामुळेच मग उच्च जातीतील लोकांना खालच्या जातीतील लोकांवर अन्याय करणं सोपं होत चाललं आहे. जातीय मानसिकता, खोटी सामाजिक प्रतिष्ठा आणि सत्तेचा हव्यास यामुळे आंतरजातीय विवाह करणाऱ्या मुला-मुलींना संपवलं जातं.

माणसापेक्षा जात महत्त्वाची अशी जी मानसिकता तयार झाली आहे, ती बदलायला हवी. घरातली स्त्री मग ती बायको, बहीण, आई कुणीही असली तरी ती म्हणजे आपली संपत्ती आहे, असं मानलं जातं. तिच्याकडे माणूस म्हणून पाहिलं जात नाही आणि म्हणूनच मग हे प्रश्न निर्माण होतात. मानशास्त्रज्ञ हमीद दाभोळकर यांच्या मते, आंतरजातीय विवाहांमुळे ऑनर किलिंगला बळी पडलेली मुलं-मुली हे खोट्या प्रतिष्ठेचे बळी आहेत. आपल्या कुटुंबाची प्रतिष्ठा वगैरे असं म्हणत या मुलांचा जीव घेतला जातो. पण ही प्रतिष्ठा खोटी असते. दैनंदिन जीवनातल्या बहुतांश गोष्टींवर जातीचा प्रभाव असतो, आणि मग याचंचं टोकाचं रुप म्हणजे आंतरजातीय विवाह केलेल्या तरुणांना मारून टाकलं जातं.

**ऑनर किलिंग टाळण्यासाठी...**

ऑनर किलिंग टाळण्यासाठी मुलांच्या प्रेम प्रकरणांबाबत पालकांनी गांभीर्यानं विचार केला पाहिजे. ज्या आई-वडिलांनी जन्म दिला, त्यांचीच मुलांना भीती वाटत असेल तर पालकांनी याचा गांभीर्यानं विचार करायला हवा. कारण मुलं पालकांकडे सेफ्टी म्हणून पाहत असतात. त्यांना मुलांचा निर्णय पटत नसेल, तर त्यांच्याशी बोलायला हवं, पण मुलांच्या जीविताशी खेळण्याचा पालकांना अधिकार नाही. घटनेने त्यांना स्वतंत्रपणे आयुष्य जगण्याचा अधिकार दिला आहे

स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्वं मानणाऱ्या सर्वांनी आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या पाठीशी उभं राहायला हवं. आंतरजातीय विवाहांना सरकारने पूर्णपणे संरक्षण द्यायला पाहिजे. आंतरजातीय विवाह करणारी जोडपी आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, असे कार्यक्रम आखायला हवेत. जातीय मानसिकता कमी करणाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना सुरू करायला हव्यात. आंतरजातीय विवाहांबाबत सर्व स्तरावर प्रबोधन केलं पाहिजे. पोलीस यंत्रणेनं यासंबंधीच्या तक्रारींची वेळीच दखल घेतली आणि कारवाई केली, तर अशा प्रकरणांना चाप बसू शकतो. हरियाणा राज्यानं कायदा बनवून आंतरजातीय विवाह केलेल्या तरुणांसाठी 'प्रोटेक्शन होम' तयार केले आहेत. इतकंच नाही तर या प्रकरणांच्या सुनावणीसाठी फास्ट ट्रॅकची न्यायालयाची स्थापना केली आहे, हे सर्व इतर राज्यांनीही केलं पाहिजे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# जिल्ह्यात कित्येक वर्षांपासून हातभट्टी व्यवसायात गुंतलेले येतायेत मुख्य प्रवाहात - मनोज लोहिया



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यात ऑपरेशन परिवर्तन काम जोमात सोलापूर जिल्ह्यात हातभट्टी व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींना या व्यवसायातून बाहेर काढण्यासाठी यापूर्वी कित्येक वेळा प्रयत्न झाले. परंतु ते तोडके पडले होते सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी मात्र या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींना अटक करून किंवा कायद्याचा धाक दाखवून बाहेर काढता येत नाही हे ओळखून त्यांनी समुपदेशन व विश्वासात घेऊन त्यांना या अवैध धंद्या पासून मुक्त करून मुख्य प्रवाहात आणण्याचा केलेला प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे असे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी गुरुवारी दुपारी सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालय येथे झालेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केले. सोलापूर जिल्ह्यातील गुन्हेगारी तपास प्रतिबंध लोकाभिमुख उपक्रम यांची आकडेवारी या संदर्भातील वार्षिक निरीक्षणा करीत आलो. या जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या समवेत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, मा.शा. पाटील आदी उपस्थित होते. मागील वर्षाच्या मानाने जिल्ह्यातील गुन्हेगारी थोडीशी वाढ झाली आहे ही वस्तुस्थिती आहे, परंतु मी या आकडेवारीला महत्त्व देत नाही. दिवसेंदिवस वेगळे प्रश्न वाढती लोकसंख्या बेरोजगारी, पॅरोलवरील सुटलेले कैदी अशा विविध प्रश्नांची कंगोरे या मागे असतात. परंतु सोलापूर जिल्ह्यातील गुन्ह्यांच्या तपासात मोठी वाढ झाली आहे. अनेक गुन्ह्यांची उकल होत आहेत. गुन्ह्यातील रिकवरी ही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. २०१९ मध्ये चोरीचे २०१५ गुन्हे होते, नोव्हेंबर अखेर ती संख्या १९८६ वर येऊन पोहोचली आहे.

**गुन्हेगारांचे लोकेशन आता कळणार**

पोलिसांच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी याकरिता व गुन्हेगारांची लोकेशन कळावे याकरिता सीएमआय हे नवीन मोबाईल ॲप लॉन्च केले आहे. यामुळे गुन्हेगारांची माहिती एका क्लिक मध्ये उपलब्ध होणार आहे विशेषता पेट्रोलिंगच्या वेळी हे या घेऊन शोध घेत असताना दहा किलोमीटरच्या परिसरात असलेल्या गुन्हेगारांची माहिती नावानिशी करणार आहे. त्याच्या हालचालीवर लक्ष ठेवता येणार आहे.


**पोलीस अधीक्षक यांच्या कामामुळे पोलीस कुटूंबिय ही समाधानी**

सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यात आज आपण आवर्जून पोलीस कुटुंबाकरता फॅमिली दरबाराचे आयोजन पोलीस मुख्यालय येथे करण्यात आले होते. त्यात पोलीस कुटुंबाच्या संदर्भातले कल्याण योजना, कौटुंबिक प्रश्न, पोलिसांच्या मुलांकरिता वाचनालय, तसेच आरोग्यविषयक सुविधा, मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती, नोकरीचे प्रश्न याविषयी कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी मनमोकळा संवाद साधला. यावेळी उपस्थित पोलीस कुटुंबीयांनी ही पोलीस अधीक्षक यांच्या कार्यामुळे समाधान व्यक्त केले.

**इझी मनीपेक्षा कष्टाचं पैसा**

सोलापूर जिल्ह्यात ऑपरेशन परिवर्तन ही मोहीम म्हणून राबवत असताना ६८५ कुटुंबे यामध्ये गुंतलेले आढळली. इझी मनीची त्यांना सवय लागली होती. यातून कष्टाचा पैसा मिळवण्याकरिता त्यांना वळवणे अवघड होते. पण त्यांना यश येत आहे. यापैकी ३०० कुटुंबीयांना हातभट्टी व्यवसायातून परावृत्त करून इतर व्यवसायात गुंतवलेले आहे. उर्वरित तीनशे कुटुंबांना सुद्धा मुख्य प्रवाहात आणू असे सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी व्यक्त केले.

# सोलापूर शहरात घरफोड्या करणाऱ्या सराईत गुन्हेगार गुन्हे शाखेच्या जाळ्यात



**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरात रात्रीच्यावेळी घरफोड्या करणाऱ्या सराईत गुन्हेगार शंकर आप्पा पवार (वय ३१) याला सोलापूर शहर गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून चार गुन्हे उघडकीस आले आहेत यासह अन्य एका गुन्ह्यातील दोन लाख आठ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. शहरांमध्ये मागील काही दिवसांमध्ये रात्रीच्या वेळी घरफोडीचे प्रकार घडल्याने विविध पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले होते. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्हे शाखेकडे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुन्ह्यांचा अभ्यास करून तसेच अभिलेखावरील आरोपी तपासून गुन्हे उघडकीस आणण्यात बाबत मार्गदर्शन केले होते गुन्हे शाखेच्या पथकाने घरफोडी चोऱ्या करणारा अभिलेखावरील आरोपी शंकर पवार यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे तपास केला असता त्याने व त्याच्या साथीदाराने जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन ठिकाणी व फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ठिकाणी अशा एकूण चार ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली. त्यामुळे त्यास अटक करण्यात आली आहे. त्याच्या साथीदारांचा शोध सुरू आहे. आरोपी पवार याच्या झडतीत ३६ ग्रॅमचे सोन्याचे दागिने, चांदीचे सुमारे १७ ग्रॅमचे दागिने असा एकूण १ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच अन्य एका घटनेत एका अल्पवयीन बालिकेने त्याच्या साथीदारांसह किडवाई चौकातील ज्वेलर्स दुकानात सोने खरेदी करण्यासाठी आलेल्या महिलेल्या पर्समधील एक लाख वीस हजारांची चोरी केली होती बालिकेच्या साथीदारांसह अटक करून त्याच्याकडून शहाण्णव हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या पथकाने एकूण पाच गुन्हे उघडकीस आणून दोन लाख आठ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त हरीश बैजल, पोलीस उपायुक्त बापू बांगर, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक तसेच पोलीस अंमलदार अंकुश भोसले, अजय अडगळे, शंकर मुळे, संदीप जावळे, विद्यासागर मोहिते आदींनी केली आहे.

# कर्मचारी संघटना ही सामुहिक शक्ती आहे -अविनाश दौंड




**नवी मुंबई/प्रतिनिधी**

कर्मचारी संघटना ही सामुहिक शक्ती असून आपल्या न्याय मागणी व हक्कासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता आहे. एकत्रित विचारातून आपले प्रश्न निश्चित सुटू शकतात. अलिकडच्या काळात सर्वच क्षेत्रात मरगळ आली आहे. ही मरगळ दूर करून नव्याने कर्मचाऱ्यांची सामुहिक शक्ती दाखवावी लागेल. असे मत बृन्हमुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस अविनाश दौंड यांनी केले. आज कोकण भवन येथे राज्य कर्मचारी संघटना, कोकण भवन शाखेतर्फे गौरव व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कोकण भवन समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ.गणेश मुळे, कार्याध्यक्ष कमलेश नागरे, सरचिटणीस डॉ.गणेश धुमाळ, आदि उपस्थित होते. यावेळी कर्मचारी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास राजेसाहेब राऊत, आनंद साईल, मच्छिंद्र नाईक, आनंद जाधव, सुभाष कदम, चंद्रकांत पवार, मोरेश्वर चौधरी, अस्मिता जोशी, मंगल कुलकर्णी, अजित न्यायनिर्गुणे, गणपत कदम,आश्विनी धुमाळ आणि संघटनेचे इतर कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**पालघर/प्रतिनिधी**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना या दोन योजना संगणक प्रणालीद्वारे राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे आणि या योजनेसाठी पात्र व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. १) वैयक्तिक कर्ज व्याज परतफेड योजना (आय.आर.१) ची कर्ज मर्यादा रु.१० लाखापर्यंत असुन ही योजना कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु व मध्यम उद्योग, उत्पादन, व्यापार व विक्री सेवा क्षेत्रासाठी आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थींचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.८ लाखाच्या मर्यादित असावे. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आणि विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असावा वय १८ ते ५० वर्ष दरम्यान असावे. अर्जदाराचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य राहिल. अर्जदाराने महामंडळाच्या संगणक प्रणालीवर नाव नोंदणी करणे आवश्यक असेल. अर्जदार कोणत्याही बँकेच्या कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. अर्ज करतेवळी सदर प्रकल्पासाठी यापूर्वी महामंडळाच्या किंवा इतर कोणत्याही महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराचे कर्ज प्रकरण हे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) आणि तत्सम संगणक प्रणालीद्वारे प्रकरण हाताळण्यास सक्षम असलेल्या बँकेत केलेले असावे. कुटुंबातील एकावेळी एकाच सदस्याला कर्ज योजनेचा लाभ घेता येईल. लाभार्थ्याने मध्येच नियमित कर्जफेड नाही केली तर, व्याज परतावा दिला जाणार नाही. लाभार्थ्याने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरू असल्याचे किमान दोन फोटो उपलोड करणे बंधनकारक असेल. २) गट कर्ज व्याज परतावा योजनेत (आय.आर.२) कर्ज मर्यादा रु. १० ते ५० लाखपर्यंत असुन ही योजना कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु व मध्यम उद्योग, उत्पादन, व्यापार व विक्री सेवा क्षेत्रासाठी आहे. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा आणि तो विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील असावा. वय १८ ते ४५ वर्ष दरम्यान असावे. अर्जदाराचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे आवश्यक राहील. अर्जदाराने महामंडळाच्या संगणक प्रणालीवर नाव नोंदणी करणे आवश्यक असेल. गटातील सर्व लाभार्थ्यांचे प्रमाणित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.८ लाखाच्या मर्यादेत असावेत. या दोन्ही योजनचे वेबपोर्टलवर www.vjnt.in ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्र १. जात प्रमाणपत्र २. उत्पन्नाचा दाखला किंवा नॉन क्रिमिलेअर लेयर प्रमाणपत्र ३ रेशन कार्ड ४ रहिवासी प्रमाणपत्र ५ वयाचा पुरावा / शाळेचा दाखला. ६ आधार कार्ड / पॅन कार्ड ७. व्यवसायाच्या अनुषंगाने कोटेशन आवश्यक राहील. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) आफरीन अपार्टमेंट, रुम नं. २०१, नवली फाटक जवळ, साईकृपा सॉ मिल समोर, नवली रोड, जिल्हा पालघर -४०१४०४, येथे संपर्क साधावा असे आवाहन वसंतराव नाईक विजाभज विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आधार मधुकर ताजने यांनी केले आहे.

# कै. रसिका महाविद्यालयात 'ब' विभाग आंतर महाविद्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धा



**देवणी/प्रतिनिधी**

कै रसिका महाविद्यालय देवणी व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'ब' विभाग आंतर महाविद्यालयीन वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टींग व बेस्ट फिजिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये आठ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर या महाविद्यालयाने पटकावले. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सचिव गजानन भोपणीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ.राजेश्वर पाटील (माजी सिनेट सदस्य) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या स्पर्धेचे निवड समितीचे चेअरमन म्हणून डॉ.दिलीप भडके, सदस्य म्हणून प्रा. सतीश मुंडे यांनी काम पाहिले. स्पर्धेचे पंच म्हणून डॉ. शिवानंद पाटील, प्रा.दत्ता मुंडे, प्रा.रोहन एनाडले, सचिन चौधरी, विक्रम गायकवाड, प्रवीण होलसंबरे यांनी काम पाहिले. या स्पर्धेतील विविध वजन गटांमध्ये मोठ्या प्रमाणात खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या स्पर्धेचे आयोजन क्रीडा संचालक डॉ. सचिन चामले यांनी केले. स्पर्धा संपन्न होण्यासाठी उपप्राचार्य डॉ.शिवाजी सोनटक्के, डॉ.विजयकुमार मोरे, डॉ.सुदर्शन पेडगे, प्रा. महादेव टेंकाळे, डॉ.वैशाली चटगे, डॉ.सुलोचना डेंगाळे, डॉ. रेणुका कुनाळे, प्रा.अंकुश भुसावळे, प्रा.अंकुश भास्कर, डॉ.प्रशांत भंडे, डॉ.गोपाल सोमाणी, डॉ.योगेश मुळे, डॉ. सी.एम.मलबा, व्यंकट पांढरे, संतोष मुळे यांनी सहकार्य केले.

# २० डिसेंबर रोजी महिला लोकशाही दिन

**पालघर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास शासन विभाग निर्णय क्रमांक मलोदि-२०१३/प्रक्र.११/मक/दिनांक ०४/०३/२०१३ अन्वये जिल्हा स्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच या महिन्याचा महिला लोकशाही दिन हा दि. २०/१२/२०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे आयोजित करण्यात येत आहे. महिला लोकशाही दिनाचा अर्ज जिल्हाधिकारी यांना उद्देशून असावा. तालुका महिला लोकशाही दिन टोकन क्रमांक व तहसीलदार यांच्या उत्तराची प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवसाच्या अगोदर अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मातोश्री बंगला, आर्यन ग्राउंड च्या शेजारी, विष्णू नगर रोड, लोकमान्य पाडा, पालघर ई मेल dwcdopalghargmail.com फोन नं. ०२५२५-२५७६२२ यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह सादर करावा. असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांनी केले आहे.

# उदगीर येथील शासकीय सामान्य रुग्णालयात चेकअपच्या नावाखाली बाळंत महिलेचा विनयभंग




**देवणी/प्रतिनिधी**

उदगीर येथील शासकीय सामान्य रुग्णालयात एक महिला शुक्रवारी प्रस्तुतीसाठी दाखल झाली होती सदर महिलेची प्रस्तुती हे सिझरव्दारे करण्यात आली. दिनांक १२/१२/२०२१ रोजी साडेबारा वाजण्याच्या सुमारास सदर २१ वर्षीय बाळांतीन महिलेचा अधिपरीचारीका ब्रदर सचीन राजमाने यांनी चेकअप करण्याच्या नावाखाली ओपीडीमध्ये घेऊन जाऊन दरवाजा आतमधुन बंद करून महिलेस झोपण्यात सांगितले. फिर्यादि महिलेचा गाऊण छातीपर्यत वर करून सिझर मुळे टाके घातलेल्या ठिकाणी हाताने जोरजोरात दाबत महिलेच्या गळ्यावर हात ठेवून स्तनातुन दुध निघत नाही असे म्हणून वाईट हेतुने त्याच्या तोंडात फिर्यादि बाळंत महिलेचे स्तन धरुन दुध काढले व तिनदा चुळण्या केल्या व इतर नको त्या ठिकाणी हाताने जोरात दाबुन विनयभंग केला. तसेच बाहेर जाऊन कोणाला सांगितले, तर गळा दाबुन मारुण टाकण्याची धमकी दिली. घडला प्रकार बाळंत महिलेने आपल्या पतीला सांगीतला. फिर्यादि पिडीत महिलेने विनयभंग केल्याची तक्रार दिनांक १३/१२/२०२१ रोजी दिलेल्या अर्जावरुण उदगीर शहर पोलीस ठाण्यात अरोपी सचीन राजमाने याच्यावर गु.र.न.३३८/२०२१कलम ३५४,५०६ भादवी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन अरोपी सचीन राजमाने यास उदगीर पोलिसांनी औसा येथुन अटक करून कोर्टात हजर केले असता न्यायालयाने अरोपीस १४ दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली असल्याचे उदगीर पोलीसाकडुण सांगण्यात आले आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डनियल बन व पोलीस निरीक्षक गोरख दिवे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक जाधव हे करीत आहेत.

# देवणी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांची तहसील कार्यालयास भेट!



**देवणी/प्रतिनिधी**

नगरपंचायत देवणी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांची तहसील कार्यालयास भेट देऊन निवडणूक अधिकारी कार्यालयास निवडणूक विषयक तयारीचा आढावा घेतला. त्यामध्ये मतदान केंद्रावर उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधा, कायदा व सुव्यवस्थेबाबत ची तयारी, आचारसंहितेच्या अनुषंगाने पथकांची तयारी, मतदान साहित्यविषयक पूर्वतयारी, covid-19 च्या अनुषंगाने पालन करावयाची मार्गदर्शक तत्वे व उपाययोजना, मतदान यंत्र ठेवण्यासाठीची स्ट्राँग रूम कक्ष, मतमोजणीची व्यवस्था यासह विवेक वर्धिनी विद्यालय येथील मतदान केंद्राची पाहणी करून मतदान प्रक्रियेच्या तयारी बाबतचा आढावा घेतला तसेच तालुक्यात कोविंड लसीकरण विषयक स्थितीचा आढावा घेतला व शंभर टक्के लसीकरण पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून काही सूचना केल्या, या बैठकीस निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी निलंगा शोभा जाधव, तहसीलदार सुरेश घोळवे, मुख्याधिकारी सुंदर बोंदर, पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे, वैद्यकिय अधिक्षक नीलकंठ सगर, तालुका आरोग्य अधिकारी दिलीप गुरमे, नायब तहसीलदार विलास तरंगे यांच्यासह निवडणूक कर्तव्या वरील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# अखील भारतीय ग्राहक पंचायत शाखेच्या अध्यक्ष पदी चंद्रकांत हांगे यांची निवड

**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपूर येथील अखिल भारतीय ग्राहक पंचायत संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली या बैठकीत सर्वानुमते नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये चंद्रकत हांगे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष ज्योती कांबळे, बालाजी पडोळे सचिव ज्ञानेश्र्वर कदम सहसचिव रघुनाथ ढवळे कोषाध्यक्ष नवनाथ कोंपले संघटक मीरा बनसोडे सहसंघटक गंगाधर कलशेट्टी प्रसिद्धीप्रमुख दिलीप कांबळे सल्लागार ॲड. सनातन काळे तर सदस्य जयराम पुणे, पत्रकार फिरोज शेख, देवानंद शिंगडे, प्रा.सादीक शेख,



तुकाराम कदम यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायत संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून....

## अनैतिक संबंधामुळे घरातील वाद...

एका ३५ वर्षीय महिलेशी कामाच्या निमित्याने ओळख झाली होती.रुक्सान (काल्पनिक नांव) तिचे नाव ती ही तिच्या नवऱ्यासोबत आणि दोन मुलासह रमाबाईनगर येथे राहत होती.कंत्राटदार कमलेश याच्याबरोबर रुक्साना ही काम करीत होती.काम करता करता ते दोघे एका वेगळ्याच कामात अडकत चालले होते.ती दिसायला देखणी सेक्सी मादक असल्याने कमलेश हा तिच्याकडे कळत नकळतपणे आकर्षीत झाला होता. तो तिच्या सौदर्याला भुलला असल्याने तिच्याशी लाडीगोडी लावत बोलत होता.कमलेश हा कंत्राटदार असल्याने त्याच्याकडे पैसा आहे हे रुक्सानाने ओळखले होते. म्हणून ती ही त्याला लाईन देत होती. दोन मुलांची आई असली तरी तिची फिगर ही चार चौघांत उठून दिसत होती. कधी एकदा तिला आपल्यां अंगखाली घेऊन कुस्करतो असे त्याला झाले होते.म्हणून तो ही तिच्याबरोबर ते संबंध ठेवायला उताविळ झाला होता. त्याच्या मनात काय आहे हे तिने बरोबर ओळखले असल्याने ती ही त्याला तशी साथ देत होती. कामाच्या निमित्याने ती त्याच्याकडून जास्त पैसे घेऊ लागली होती. तो ही तिला मागेल तेवढे पैसे देत होता.त्याला तिच्याबरोबर संबंध वाढवायला तसे कारणच पाहिजे होते.दमडी दिली की काही बायका या चमडी देतात हे त्याला चांगले माहित होते.म्हणून त्याने आपला हात तिच्या बाबत ढिला सोडला होता. ती ही त्याला घरी नवरा नसताना बोलवू लागली होती. तिला माहित होते की आपण वर केले की तो संधी साधणार म्हणून तिने ही त्याला मोकळीक दिली. त्याच्याशी लाडीगोडी लावत असताना ती त्याला बिलगत होती. एकदा संधी साधत त्याने तिला मिठीत घेत तिच्या डाळींबीसारख्या ओठाचे रसपान केले. कबुतरांना दाबादाबी करत त्याने तिला कामसुखासाठी तयार केले. तो तयार झाल्याचे बघून तिने ही आपले कपडे उतरविले तसे त्याने ही आपले कपडे काढले.तिचा गोरा पान नग्न देह बघून तो चवताळलाच होता. तिच्या नागडया अंगावर तुटून पडत त्याने तिला चांगलेच घोळवले. ती ही त्याला दमदारपणे खालून साथ देत होती. त्या दोघाचा तो नागडा रोमान्स बराच वेळ चालला होता.तो तिला खेळवत असताना तिने आपल्या नवऱ्यात काही दम नाही हे ओळखले आणि त्याला आपल्या नागडया अंगावर ओढून घेत मस्तपैकी त्याच्याबरोबर मजा मारली. त्याने ही तिच्यावर तुटून पडत तिला चांगलचे रखडले होते. तिने आता त्याला चमडी दिल्याने त्याच्याकडून दमडी काढायला रिकामी झाली होती. ती त्याच्याकडेच काम करीत असल्याने ती मागेल तेवढे पैसे तिला देत होता. बदल्यात तिच्याकडून शरीरसुख ओरबाडत होता. त्या दोघाचे एकमेकासोबत सुत जुळले होते. त्या दोघाच्या संबंधाची चर्चा ही होत होती. ही चर्चा रुक्सानाच्या नवऱ्याच्या कानावर ही आली. तो तिच्याबरोबर भांडू लागला तिला मारहाण करू लागला.भांडणात तो तिला कमलेशचा नाद सोडून दे म्हणून सांगू लागला.पण ती बाई काही ऐकणाऱ्यातील नव्हती. उलट ती नवऱ्याच्या मर्दानगीवर बोट ठेवत त्यालाच खाली मान घालायला लावत होती.तुला सोडेन पण कमलेशला सोडणार नाही हे तिने त्याला सांगितले. ती त्याचा नाद सोडत नव्हती. उलट दिवसे दिवस त्या दोघाचे संबंध वाढीस लागले होते.आता तर ती नवरा असताना ही कमलेशला आपल्या घरी त्या कामासाठी बोलावू लागली. त्याचेसमोरच ती त्याचेबरोबर झोपत होती.या गोष्टीला तिचा नवरा वैतागलेला होता.त्याला काय करावे काय नको असे झाले होते. म्हणून त्याने आपल्या दोन्ही मुलांना आपल्या बरोबर घेऊन चंद्रपूर सोडले.तो दुसऱ्या गावी निघून गेला. रुक्साना ही आता एकटीच राहत होती.त यामुळे कमलेशचे ही आता फावले होते.तो आता ती बोलावले त्यावेळी तिच्याकडे येत होता. पैसे देऊन त्याच्याकडून शारीरिक सुख घेत होता. त्या दोघांचे अनैतिक सबंध हे गेल्या पाच वर्षापासून सुरू होते.त्या दोघाच्या संबंधाची माहिती कमलेशच्या पत्नीला,मुलाना समजली होती. त्यामुळे त्याच्या ही घरात या कारणातून भांडणे लागली होती.कमलेश हा घरी पैसे देत नव्हता. सगळा पैसा तो रुक्सानावर खर्च करीत होता. ही गोष्ट त्याच्या पत्नीला आणि २० वर्षीय मुलाला खटकत होती. त्यांनी त्याला त्या बाईचा नाद सोडून दया.घराकडे लक्ष दया म्हणून सांगितले पण त्याला ही रुक्सानाची चटक लागल्याने तो ही त्याचा नाद सोडायला तयार नव्हता. कमलेची बायको या कारणावरून त्याला धारेवर धरत होती.त्यातून तो ही तिला मारहाण करीत होता.परक्या बाईमुळे घरात अशर्स वडिलाची भांडणे होत आहेत. त्या बाईसाठी वडिल आपल्या आईला मारहाण करीत असतात ही गोष्ट त्या मुलाला ही पटत नव्हती.घरातील भांडणे असह्य झाल्यावर तो ही वडिलाच्या प्रियेसीवर चिडला होता. त्याने तिलाच आपल्या वडिलाच्या मार्गातून बाजुला करायचे म्हणजे वडिल मार्गावर येतील असा सारासार विचार केला. त्याने हा विचार आपला अल्पवयीन चलुत भावाला देखील सांगितला. त्या दोघांनी रुक्सनाला देखील समजावून सांगून पाहिले. पण तिच्या दृष्टीने नादान होती. ती काय सांगतात.त्यापेक्षा कमलेश हा तिच्यासाठी कुबेराचा खजिना होता. म्हणून तर ती त्याच्यासाठी आपल्या जवानीचा खजिना रिकामा करीत होती. तो हातातून गेला की तिचे सगळे संपणार होते. म्हणून ती कमलेशला सोडायला तयार नव्हती. तिने त्याच्यासाठी आपल्या नवऱ्याला आणि मुलांना ही सोडले होते.त्यावेळी तिने सहजच त्या मुलाना म्हटले की तुम्ही दोघेजण अजून अंडयात आहात नाही तिकडे लक्ष देवू नका. मला त्रास देवू नका. मोठयाच्याच्या फंदात पडण्या इतपत अजून तुम्ही मोठे झाला नाहीत.गप्प येथून निघून जावा. तिचे हे बोलणे कमलेशचा मुलग्याच्या जिव्हारी लागले. तो आता तर जास्तच तिच्यावर चिडला होता. हिच्यामुळे आपल्या घरात भांडणे लागली आहेत आणि उलट हिच आपल्याला शहाणपणाच्या गोष्टी सांगते म्हणून त्या दोघांनी तिला संपविण्याचा विचार केला. रमाबाई नगर येथेच ती राहत असल्याने ती कधी काय करते याची माहिती त्या दोघांना होती. बुधवार दि.८ डिसेंबर २०२१ रोजी रुक्साना सकाळी लवकर उठली. मोहल्यात असणाऱ्या शौचालयास ती नेहमी प्रमाणे सकाळी प्रांतविधीसाठी चालली होती. त्यावेळी तिच्यावर पाळत कमलेश याचा मुलगा आणि भावाचा मुलगा यांनी ठेवले होते. अजून तांबडे फुटले नव्हते. ती नेहमी प्रमाणे प्रातंविधीसाठी चालली होती. ती पुढे बघून जात असताना कमलेश याचा मुलगा आणि त्याचा चुलत भाऊ या दोघांनी मिळून पाठीमागून येवून तिच्या मानेवर, गळ्यावर आपल्याकडील धारदार चाकूने सपासप वार केले. त्याच्या वर्मी घावात ती रक्ताच्या थारोळ्यात पडली.तिच्या गळ्यातून आणि मानेवर वार झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तिचा आपल्या हातून खून झाल्याचे लक्षात येताच त्या दोघांनी ही तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावणेसाठी म्हणून त्यांनी तिचा मृतदेह आपल्या गाडीवर ठेवला आणि तो रमाबाईनगर येथे असणाऱ्या जवळच्या झटपट नदी शेजारी असणाऱ्या झाडा झुडपात नेवून टाकला.त्यानंतर ते दोघे ही तेथून कोणाला काही कळायच्या आत निघून गेले. त्यानंतर सकाळी सकाळी त्या परिसरातील लोकांना झटपट नदीच्या शेजारी झाडाझुडपात एका महिलेचा मृतदेह पडला असल्याचे दिसले. त्यांनी या घटनेची माहिती रामनगर पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले त्यांनी घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून मयत महिलेची ओळख पटवली. मयत महिला ही रमाबाईनगर येथेच राहत असल्याचे त्याना समजले.घटनास्थळाचा पंचनामा करून त्यांनी तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्याना मयत रुक्साना हिचे विवाहबाहय संबंध हे कंत्राटदार कमलेश याच्याबरोबर असल्याचे समजले. तसेच तिने या संबंधातून नवऱ्याला आणि मुलांना ही सोडले असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून पोलीसांनी कमलेश याला ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची चाकैशी करत असताना त्याचे हे संबंध त्याच्या घरातील लोकांना आणि मुलग्याला मान्य नव्हते या कारणातून त्याच्या ही घरी सारखी भांडणे होत असल्याचे त्याने पोलीसाना सांगितले. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्याने रुक्सानाचा खून केला नसल्याचे पुढे आले. मग तिचा खून कुणी आणि कशासाठी केला याचा तपास करीत असताना या घटनेची एक एक कडी पोलीस जोडत असताना कमलेश याच्या मुलाचे मयत रूक्सानाबरोबर भांडण झाल्याची माहिती पोलीसाना मिळाली.या माहितीवरून पोलीसांनी त्याला संशयावरून चौकशीसाठी ताब्यात घेतले असता तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता.पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच तो पोपटासारखा बोलू लागला. त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी रुक्सानाचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी कमलेश याचा २० वर्षीय मुलगा आणि त्याचा अल्पवयीन भाऊ याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्या दोघांना मा.कोर्टासमोर उभे केले.मा.कोर्टाने २०वर्षीय मुलाला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.तर अल्पवयीन मुलाला सुधारगृहात पाठवून दिले.

## भाईगिरीचा शेवट भयंकर झाला...

नगरात सागर पुनम कंडारे आणि विशाल विजय सपकाळे हे दोघे तरुण रहात होते. ते देखील एरियात आपले वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करत होते. या वर्चस्ववादातून घातक आणि सागर व विशाल यांच्यात कित्येकदा वादाची ठिणगी पडत असे. किरकोळ वाद कधीकधी पराकोटीला जात असे. ४ डिसेंबर २०२१ च्या रात्री पावणे अकरा वाजता कमी अधिक प्रमाणात मद्यपान करुन घातक घरी आला. घरी आल्यानंतर तो जेवण करण्यास बसला. त्याचवेळी बाहेर गल्लीत आरडाओरड सुरु असल्याचा आवाज त्याला आला. सागर कंडारे आणि विशाल सपकाळे हे दोघे जण कुणाशी तरी वाद घालत होते. त्या वादातून सागर हा जोरजोरात ओरडत होता. तुमच्या एरियाचा दादा पवन घातक याला बोलव. तो खुप माजला आहे, त्याला सुद्धा बघून घेतो अशा प्रकारचा संवाद जेवण करत असलेल्या घातकच्या कानावर आला. आपल्या नावाचा वापर होत असल्याचे ऐकून घातक तसाच उठला व बाहेर आला. त्यावेळी सागर व अमोल चौधरी यांच्यात वाद सुरु असल्याचे त्याला दिसून आले. आपल्या नावाचा काय उल्लेख आला याबाबत घातकने दोघांना जाब विचारण्यास सुरुवात केली. घातक व सागर या दोघात वादाची ठिणगी पडली. दोघात बाचाबाची होण्यास वेळ लागला नाही. घातक व सागर असे दोघे जण वाद घालत काही अंतरावर गेले. दोघात सुरु असलेल्या वादाचे पर्यावसन हाणामारीत होणार असल्याचा अंदाज त्याचा भाऊ आणि आई या दोघांना आला होता. त्यामुळे तेदेखील त्यांच्या मागेमागे गेले. घातकने सागर कंडारे या विचारले की तू माझे नाव का घेतो. तुझ्या व अमोलच्या वादात माझा काय संबंध आला? वाद सुरु असतांना सागरने घातकसह त्याच्या आईला शिवीगाळ केली. आपल्यासोबत आपल्या आईला शिवीगाळ केल्याचे बघून घातक चिडला. चिडलेला घातक सागरच्या अंगावर धावून गेला. वाद उग्र रुप धारण करत असल्याचे बघून सागर व विशाल या दोघांनी घातकच्या दिशेने दगडफेक सुरु केली. या दगडफेकीत घातक जखमी झाला. त्याच्या डोक्यातून व तोंडातून रक्त निघू लागले. घातक जखमी झाल्याचे बघून सागर व विशाल हे दोघे पलायन करु लागले. मात्र दगडांचा मार बसल्यामुळे चवताळलेला घातक पेटून उठला. लाकडी दांडा हातात घेत तो दोघांच्या मागे धावत सुटला. घातक दोघा हल्लेखोरांच्या मागे धावत असल्याचे बघून त्याची आई व भाऊ हे दोघे देखील त्याच्या मागेमागे गेले. चिडलेल्या घातकने दोघांना हातातील बेसबॉलच्या दांड्याने मारहाण सुरु केली. प्रतिउत्तरादाखल दोघांनी घातकच्या दांडक्याने त्यालाच मारहाण सुरु केली. जवळच असलेल्या साईबाबा मंदीराच्या मागील गल्लीत विशालने घातक यास मागच्या बाजूने घट्ट पकडून ठेवले. विशालने घातकला पकडून ठेवल्याचे बघून सागरने त्याच्या पोटावर, मानेवर, पाठीवर आणि डोक्यावर चाकूचे सपासप घाव घालण्यास सुरुवात केली. अगोदरच दगडांच्या व लाकडी दांड्याच्या मारहाणीत जखमी झालेला चाकूच्या घावामुळे धारातीर्थी पडला. या मारहाणीचे दृश्य बघण्यासाठी गर्दी जमा होण्यास वेळ लागला नाही. लोकांची गर्दी जमा होत असल्याचे बघून सागर व विशाल हे दोघे तेथून पळून गेले. रक्ताच्या थारोळयात पडलेल्या घातक यास त्याचा भाऊ प्रतिक याने चुलत भाऊ अजयच्या मदतीने मोटार सायकलवर मध्यभागी बसवून शासकीय रुग्णालयात दाखल केले. घातकची प्रकृती जास्त बिघडल्याने त्याला पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. जीवनमरणाच्या सिमारेषेवर घातक निपचीप पडला होता. डॉक्टरांच्या मदतीने तो मृत्युसोबत झुंज देत होता. या हल्ल्याची माहिती मिळताच अप्पर पोलिस अधीक्षक चोपडे, सहायक पोलिस अधीक्षक कुमार चिंता तसेच पो.नि. प्रताप शिकारे यांच्यासह सहायक फौजदार अतुल वंजारी, मिलिंद सोनवणे, गफ्फार तडवी, सचिन पाटील, दीपक चौधरी, रविंद्र चौधरी, इमरान सैय्यद, किशोर पाटील, सुधीर साळवे, मुकेश पाटील आदींनी घटनास्थळ गाठले. घटनास्थरील उपस्थित जमावाच्या माध्यमातून पोलिस अधिकाऱ्यांनी हकीकत समजून घेतली. पोलिस अधिकाऱ्यांनी हल्लेखोरांची नावे निष्पन्न करत त्यांच्या मागावर एक पथक रवाना केले. ज्या रुग्णालयात जखमी घातक दाखल होता त्या रुग्णालयात जावून त्याच्या तब्येतीची विचारपूस करण्यात आली. याप्रकरणी जखमी घातक याचा भाऊ प्रतिक सोनवणे याने दिलेल्या फिर्यादीनुसार सागर पूनम कंडारे व विशाल विजय सपकाळे या दोघांविरुद्ध भा.द.वि. ३०७, ५०४,५०६, ३४ नुसार एमआयडीसी पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान जखमी घातक रुग्णालयात मृत्युशी झुंज देतच होता. मात्र मृत्युसोबत कडवी झुंज देऊन देखील घातक अपयशी ठरला. त्याने रुग्णालयातच अखेरचा श्वास घेतला. त्यामुळे याप्रकरणी ३०२ हे कलम दोघा हल्लेखोरांविरुद्ध वाढवण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत एमआयडीसी पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने दोघा हल्लेखोरांना मेहरुण बगीचा परिसरात शोधून अटक केली होती. दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला दोघांना पोलिस कोठडी सुनावली. पोलिस कोठडी दरम्यान गुन्हयात वापरण्यात आलेला चाकू व तुटलेला लाकडी दांडा जप्त करण्यात आला. एरियाचा दादा म्हणवणाऱ्या घातक याचे सागर व विशाल या दोघांसोबत गेल्या एक वर्षापासून वाद सुरु होते. मयत घातक व अटकतील दोघा जणांविरुद्ध पोलिस स्टेशनला गुन्हे दाखल आहेत. मयत घातक व अटकेतील दोघे तरुण पोलिसांच्या अभिलेख्यावरील गुन्हेगार आहेत. मयत घातक हा एमआयडीसी पोलिसांच्या अभिलेख्यावारील गुन्हेगार होता. त्याच्याविरुद्ध एकूण १५ गुन्हे दाखल आहेत. अटकेतील सागर व पुनम यांच्याविरुद्ध तिन गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्याच्या तपासकामी पो.नि. प्रताप शिकारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार अतुल वंजारी, मिलिंद सोनवणे, गफ्फार तडवी, सचिन पाटील, दीपक चौधरी, रविंद्र चौधरी, इमरान सैय्यद, किशोर पाटील, राजेंद्र कांडेकर, सुधीर साळवे, मुकेश पाटील आदींनी परिश्रम घेतले. याप्रकरणी पुढील तपास पोलिस उप निरीक्षक दीपक जगदाळे व सचिन मुंडे करत आहेत.

## आजीचा खून करून नातू फरार झाला...

अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला होता. पवई पोलिसांनी फिर्यादी दत्ताराम वाघमारे यांच्याकडे या गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता, मृतक महिलेचे नाव शशिकला मारोती वाघमारे (वय ७५) रा.अंधेरी (पूर्व), मिलेटरी रोड, के.बी.एम कंम्पाऊड शेजारील गणपत चाळ, खोली नंबर ३ मुंबई असे असल्याचं सांगितलं. मात्र तिची हत्या कोणी केली असावी या बाबत विचारणा केली असता त्याने कानावर हात ठेवलं. पोलिसांना मृतदेहची ओळख पटली होती. आता पोलिसांसमोर प्रश निर्माण झाला होता तो हाच की शशिकला वाघमारे या जेष्ठ महिलेची हत्या कोणी केली? त्यांच्या राहत्या घरात मूतदेह सापडल्यामुळे ही हत्या चोरीच्या उद्देशाने झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत होते .कारण शशिकला यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने होते, ते गहाड झाले होते. पोलिसांचे चौकशीचे सत्र सुरू झाले होते. ज्या चाळीत शशिकला वाघमारे या राहत होत्या, त्या चाळीतील रहिवाशांकडे त्यांचे कोणाशी भांडण झाले होते का? याची ही माहिती घेतली जात होती. विशेषतः आरोपीने गुन्हा करताना कोणत्याही प्रकारचा पुरावा न सोडल्याने हा गुन्हा उघडकीस आणणे पोलिसांना समोर मोठे आव्हान होते. पवई पोलिसांनी बरेच प्रयत्न करून ही हा गुन्हा उघडकीस येत नव्हता. या गुन्हयाचा संमातर तपास गुन्हे अन्वेषण विभाग कक्ष-१० मार्फत करण्यात येत होता. कक्ष-१०चे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महेशकुमार ठाकूर यांनी मागील ६ महिन्यापासुन हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी आपल्या कक्षातील सपोनि धनराज चौधरी, सपोनि गणेश तोडकर, पो.ह. धारगळकर, शेटे यांचे एक पथक स्थापन केले होते. या पथकाने शशिकला वाघमारे या जेष्ठ महिलेच्या हत्येच्या गुन्हयाचा तपास पुन्हा नव्याने, सुरवातीपासुन सुरू केला होता. या पथकाने मयताचे नातेवाईक, स्थानिक लोकांकडे वेळोवेळी चौकशी करून गुन्हयाबाबत जास्तीत जास्त माहिती गोळा केली. परंतु आरोपी आणि गुन्हयाचा नेमका हेतु याबाबत माहिती प्राप्त होत नव्हती. दरम्यान गुन्हे शाखेच्या पथकाने मृतकच्या नातेवाईकांकडे सतत कौशल्यपुर्ण तपास केला. तेव्हा मृतक महिलेचा नातु प्रदिप तुकाराम सोनावणे, हा कोणत्याही नातेवाईक किंवा मित्र मंडळी यांच्या संपर्कात नसल्याचे आढळून आले. तसेच तो शशिकला यांची हत्या झाली त्यादिवसापासून पत्नी आणि घर सोडून फरार झाल्याची माहिती प्राप्त झाली. प्रदीप हा सोशल मीडियावर सतत कार्यरत राहायचा म्हणून गुन्हे शाखेच्या पथकाने त्याचे सोशल मिडीया अकाउंटस तपासले. तेव्हा तो सोशल मिडीयावर देखील सक्रीय नसल्याचे दिसून आले. या कारणांमुळे मयत महिलेचा नातु प्रदिप तुकाराम सोनावणे याच्यावर अधिकाधिक संशय बळावला. पण त्याचा ठावठिकाणा तो मिळून येत नव्हता. प्रभारी पोलीस निरीक्षक महेशकुमार ठाकूर यांच्या अधिपत्याखाली गुन्हे शाखेचे पथक सतत संशयीत आरोपीच्या मागावर होते. परंतु त्याच्या ठावठिकाण्याबाबत कोणतीही माहिती प्राप्त होत नव्हती. अशातच काही दिवसांपूवी प्रदीपने त्याच्या नातेवाईकाला सोशल मिडीया व्दारे संपर्क केल्याची माहिती कक्ष १० चे पथकास मिळाली. त्या माहितीच्या आधारे प्रदीपचे सोशल मिडीया अकाउंट तपासले असता, त्याने अकाउंट डिलीट केल्याचे लक्षात आले. यावरून प्रदीप खूप चलाख असल्याचे दिसून येत होते .परंतु आता त्याने कितीही चलाखी केली तरी तो फार काळ पोलिसांपासून लपून राहू शकत नव्हता. कारण प्रदीपचा फोटो पोलिसांच्या हाती लागला होता .त्या फोटो वरून पोलिसांनी आपल्या खबऱ्या मार्फत त्याचा शोध सुरू केला. या तुटपुंज्या माहितीच्या आधारे पथकाने केलेल्या तांत्रिक तपासामध्ये प्रदीप हा कल्याण परिसरांत राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. कल्याण हे तालुकाचे ठिकाण १५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरात प्रदीपचा नेमका कुठे शोध घाययचा हा मोठा प्रश्न होता. तरीही पोलिसांनी सतत रात्रंदिवस कल्याण परिसरांत आरोपीचा शोध सुरू केला. तेव्हा प्रदीप रंगकाम (पेन्टर) करीत असल्याचे पोलिसांना समजले. पथकाने कल्याण परिसरांतील खडकपाडा, चिकनघर, व्दारली, कोळसेवाडी, आधारवाडी या भागातील हार्डवेअरची दुकाने तपासून आरोपीची माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. तसेच बिल्डिंग आणि चाळीत रंगाकाम करणाऱ्या व्यक्तींकडे वेशांतर करून ग्राहक बनून आरोपीचा शोध घेतला. तेव्हा प्रदीप हा कल्याण (पुर्व)कडील नांदीवली गावांत राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. गुन्हे शाखेचे पथक नांदवली गावात रवाना झाले. नांदवली गाव हे ग्रामपंचायतच्या हद्दीत येत असल्याने गावातील रहिवाशांकडून गावातील लोकांबद्दल माहिती मिळायला वेळ लागला नाही. रंगकाम करण्यासाठी रंगारीची गरज असल्याचे भासवून पथकाने स्वतःची ओळख लपवून प्रदीपचा एका कडून मोबाईल नंबर प्राप्त केला. प्रदीपचा मोबाईल क्रमांक तो पूर्वी राहत असलेल्या अंधेरीतील मरोळ येथील पत्त्यांवर रजिस्टर होता. ते सिमकार्ड त्याचे मुंबईचे होते. त्या पत्यावर तो राहत नव्हता. आता त्याचा मोबाईल नंबर पोलिसांच्या हाती लागला होता. पण तो नवीन नंबरहुन आलेला कॉल उचलत नव्हता. स्विकारत नव्हता. त्यामुळे प्रदीपचा शोध घेणे कठीण झाले होते. मागील ७ वर्षापासून प्रदीप स्वतःचे आस्तित्व लपवून वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन राहत होता. त्यामुळे तो खुनातील आरोपी आहे हे कोणाच्या लक्षात येत नव्हते. गुन्हे शाखेला आता ही संधी सोडायची नव्हती. ७ वर्षा पासून तो पोलिसांना गुंगारा देत होता. पथकाने कोणताही धोका न पत्करता नांदीवली परिसरांत एका घरामध्ये कलरचे काम करायचे आहे, असे चित्र निर्माण करून त्याच्या ओळखीच्या इसमामार्फत प्रदीप याला रंगाचे काम करण्यासाठी बोलावून घेतले. लॉकडॉऊन मुळे आधीच कामधंदे थंडे असल्याने आलेले काम सोडायचे नाही. या उद्देशाने तो तेथे आला. त्याला काय माहीत की मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस त्याच्या मागावर आहेत. तो ओळखीच्या माणसाने बोलावल्याने लगेच नांदवली येथे आला. गुन्हे शाखेच्या पोलिसाने लगेच त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर प्रदीपला मरोळ येथील गुन्हे शाखेच्या कक्ष १० मधील कार्यलयात आणण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेशकुमार ठाकूर यांनी प्रदीप कडे त्याची आजी शशिकला वाघमारे यांच्या खुना बदल चौकशी केली. परंतु तो प्रथम उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. सतत कौशल्यपुर्वक वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरून चौकशी केली असता त्याने अखेर आजीची हत्या केल्याची धक्कादायक कबुली दिली. पण का? असा सवाल केला असता तो गुन्ह्याची हकींगत पोलिसांना सांगू लागला, ती अशी..! प्रदिप तुकाराम सोनावणे हा आपल्या पहिल्या पत्नीसह अंधेरी (पू.) मरोळ भागात राहत होता .त्यांचा सुखाचा संसार चालला होता. मात्र काही दिवसातच या दोघा पतिपत्नीत कुठल्या तरी क्षुल्लक कारणावरून वाद झाला आणि त्याची पहिली पत्नी त्याला सोडून गेली. त्यानंतर त्याचे अंधेरीत राहणाऱ्या एका दुसऱ्या मुलीशी सूत जुळलं. मुलगी सुंदर असल्याने प्रदीप तिच्या सौन्दर्यावर मोहित झाला. पुढे या दोघात मैत्री झाली. मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. प्रदीप कुशल रंग काम करणारा कारागीर असल्याने मुलीला तो आवडला. दोघांची पसंती झाल्याने त्यांनी प्रेमविवाह केला. लग्नानंतर तो तिला घरात घेऊन आला. प्रदीप विवाहित असल्याची तिला कुठलीच कल्पना नव्हती. त्यामुळे ती प्रदीप सोबत आनंदात राहू लागली. मात्र या प्रेमविवाहला त्याची आजी शशिकला वाघमारे यांचा विरोध होता. पहिली पत्नी जिवंत असताना प्रदीपने दुसऱ्या मुलीला नांदी लावले हे तिला खटकले. त्यामुळे ती प्रदीप बदल दुसऱ्या पत्नीला सांगू लागली. तिचे कान भरू लागली . प्रदीपची वर्तणूक चांगली नाही. त्याची पहिली पत्नी त्याला सोडून गेली. पत्नीने याबाबत त्याला विचारले असता त्याने पहिली पत्नी वारली असे तिला सांगितले. त्यामुळे ती गप्प बसली. पण प्रदीपने आपली फसवणूक केली याचे दुःख तिला टोचू लागले . कारण ती एक स्त्री आहे. तिला देखील भावना आहेत. तिच्या पण काही अपेक्षा आहेत. तिने सुध्दा स्वप्ने पहिली असतील. परंतु तिला देखील प्रदीपने फसविले. आजीला हीच गोष्ट खटकली. म्हणून आजी शशिकला यांनी त्याच्या दुसऱ्या पत्नीला प्रदीप बदल सर्व काही सांगून टाकले . आपल्या आजीने दुसऱ्या पत्नीला सर्व माहिती सांगितली याचे त्याला वाईट वाटले. या गोष्टीचा त्याला राग आला. या रागातून त्याने आजीची हत्या करण्याची योजना आखली. दिनांक ११ जून २०१४ रोजी सायंकाळी ७.३०च्या सुमारास आजूबाजूला कोणी नसताना प्रदीप शशिकला यांच्या घरात घुसला. यावेळी आजी घरात बसलेली होती. अचानक त्याने ७५ वर्षीय आजीवर झडप घालून तिचा करकचून गळा दाबला. प्रदीपच्या अचानक हल्ल्याने ती भांबावून गेली . वयोवृद्ध असल्याने आजी त्याचा प्रतिकार करू शकली नाही. कही वेळातच आजीने प्राण सोडले. काम झाल्यावर प्रदीपने तो राहत असलेली खोली आणि दुसऱ्या पत्नीला सोडून तेथून पळून गेला. तो फ़िरत फिरत कल्याणला आला. कल्याणच्या नांदवली गावात राहून रंगारी काम करू लागला. प्रामाणिकपणे काम करत राहिल्याने तो खुनातील आरोपी आहे हे कोणाच्या लक्षातच आले नाही .नांदवली गावात त्याने परत तिसरे लग्न केले. त्या पत्नी सोबत तो राहू लागला. प्रदीप सात वर्ष कोणाच्या संपर्कात नव्हता. आता पोलीसही खुनाचा गुन्हा विसरले असतील असे समजून तो सोशल मीडियावर सक्रिय झाला. तिथेच तो फसला. सोशल मीडियावर सक्रिय असताना तो नातेवाईकांच्या संपर्कात आला. नंतर त्याने सोशल मीडिया वरील अकाऊंट बंद केले. परंतु त्याचा फोटो सोशल मीडिया मुळे पोलिसांच्या हाती लागला. तोच धागा पकडून पोलिसांनी त्याचा पाठलाग करत त्याला सात वर्षानंतर अटक केली. प्रदीप तुकाराम सोनावणे (वय ३८) राहणार गणेश कृपा अर्पाटमेंट, काका धाबा जवळ, नांदिवली, ता. कल्याण, जि.ठाणे यास दिनांक ३ डिसेंबर २००२१ रोजी मुंबई गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून त्याच्या विरोधात गु.र.क्र. २५१/२०१४, कलम ३०२, ४५२, ३९४, ३४२ अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपासा साठी प्रदीपला पवई पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. ही यशस्वी कामगिरी मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मिलिंद भारंबे , अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) एस. विरेश प्रभू, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) नीलोत्पल, सहाय्यक पोलीस आयुक्त (डि पश्चिम) नितीन अलकनुरे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष १०चे पोलीस निरीक्षक महेशकुमार ठाकूर, सपोनि. धनराज चौधरी, सपोनि गणेश तोडकर, पोह.धारगळकर, शेटे आणि पो.ना. रमेश नलावडे यांनी पार पाडली.

पान ८ वरून....

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले ...

सोपी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा जनहितासाठी किती उत्तमपणे उपयोग करून घेता येतो याचे हे उत्तम उदाहरण असल्याचे सांगतांना मुख्यमंत्र्यांनी कर्तव्याप्रती समर्पित राहून एका वेगळ्या उर्जेने काम केल्याबद्दल तसेच सर्वसामान्यांची आरोग्य सुविधा प्रभावीपणे त्यांच्यापर्यत वेगाने पोहोचवल्याबद्दल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव प्रदीप व्यास व पालघरचे जिल्हाधिकारी माणिक गुरसळ यांच्यासह आरोग्य विभागातील तसेच जिल्हा प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे कौतूक केले आहे. जव्हार स्टेडियम ते प्राथमिक आरोग्य केंद्र झाप मधील अंतर २५ कि.मी आहे. जिथे रस्त्याने हे अंतर पार करण्यासाठी अंदाजे एक तासाचा कालावधी लागतो तिथे ड्रोनच्या सहाय्याने केवळ ९ मिनिटात कोविशिल्ड लसीचे ३०० डोस प्राथमिक आरोग्य केंद्र झाप येथे पाठविण्यात आले एवढेच नव्हे तर यातून लगेचच ३०४ नागरिकांचे लसीकरण देखील करण्यात आले. हा नावीन्यपूर्ण उपक्रम सार्वजनिक आरोग्य विभागाने ब्ल्यू इन्फिनिटी इनोव्हेशन लॅब आणि आय आय एफ एल फाऊंडेशनच्या मदतीने यशस्वीरितीने पूर्ण केला. यामुळे लसीची शीतसाखळी अबाधित राखणे, प्रवासादरम्यान होणाऱ्या वेळ आणि श्रमाची बचत होण्यास मदत झाली आहे. ड्रोनच्या सहाय्याने झालेली लस वाहतूक हे एक पथदर्शी उदाहरण आहे, याबरोबरच भविष्यात औषध, रक्त पुरवठ्यासह अवयव प्रत्यारोपणाच्या कामालाही एक नवी दिशा मिळणे शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

## सह्यगिरी अँडव्हेचर परिवार आयोजित...

होता. जनरल बिपिनजी रावत व त्यांचे इतर सहकारी यांना कोकणकड्यावर श्रद्धांजली वाहण्यात आली. ही मोहीम यशस्वी पार पाडणाऱ्या सह्यगिरी अँडव्हेंचर-परिवार मोहिमेतील दीपक विशे, शांताराम बाम्हणे, विजय कालेकर, गिरीश डेंगाणे व कुसुम विशे व इतर सहकारी यांचे विशेष आभार मानले.

## लातूर ते तिरूपती रेल्वेसेवा लवकरच...

परळी - पुणे - मुंबई गाडी सुरू करावी. अकोला-परळी -लातूर मार्गे नागपूर-गोवा ही गाडी सुरू करावी. हैदराबाद -हडपसर ही गाडी पनवेल पर्यंत वाढवावी. कोल्हापूर- बिदर गाडीचा हैदराबाद पर्यंत विस्तार करावा. इंदोर-दौंड या गाडीला लातूर पर्यंत पाठवावे. लातूर-अजमेर साप्ताहिक रेल्वे सुरू करावी. लातूर-मुंबई रेल्वेला ६बोगी वाढवाव्यात,यासह इतरही मागण्या निजाम शेख यांनी या निवेदनात केल्या आहेत. या संदर्भातही सकारात्मक विचार करण्याचे आश्र्वासन महाप्रबंधकांनी यावेळी दिल्याचे निजाम शेख यांनी सांगितले. यावेळी सोलापुरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक शैलेंद्र गुप्ता, वरिष्ठ वाणिज्य मंडल प्रबंधक प्रदीप हिरडे,श्रेयांश चिंचवड़े, मंडल सुरक्षा आयुक्त, आर पी एफ सोलापूर श्रेयांश चिंचवडे, लातूर येथील बी.के. तिवारी,फाजील शेख,शेखर गोखले,अविनाश बनसोडे यांच्यासह रेल्वेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## प्रलंबित वैद्यकीय देयके निपटाऱ्यासाठी ...

डॉ. दोडमणी, डॉ.निलम यादव, डॉ.अमितकुमार पाटील, डॉ. सुधाकर केदार, डॉ. अरूण पालवदे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी नागेश पाटील, कनिष्ठ सहाय्यक कोळी ही आरोग्य विभागाची टीम वैद्यकीय देयकांच्या तांत्रिक मंजूरीसाठी उपस्थित होती. त्याचप्रमाणे शिक्षण विभाग, अर्थ विभाग, ग्रामपंचायत विभाग, महिला बालकल्याण विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग व सामान्य प्रशासन विभागातील कर्मचारी उपस्थित होते. या विशेष मोहीमेमध्ये दिवसभरात शिक्षण विभाग ७२०, ग्रामपंचायत विभाग ४३, सामान्य प्रशासन विभाग १८ व इतर विभागातील १० अशी ७९१ वैद्यकीय देयके निकाली काढण्यात आली. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण सभागृहात स्वतः मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी उपस्थित होते. त्याचप्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसींह पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील, ईशाधीन शेळकंदे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी उत्तम सुर्वे, कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड हे विभाग प्रमुख उपस्थित होते.

## पालकांनो! तुमची स्वप्ने मुलांवर...

स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारी श्री मारवाडी राजस्थान विद्यालय ही कायम मनात आपल्या मनात कोरली असल्याचे गौरव उद्गार त्यांनी काढले. संस्थेच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव व शिष्यवृत्ती वितरण समारंभात संस्था अंतर्गत सर्व शाळांतील जवळपास पावणेदोनशे विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.या समारंभाला श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, संस्थेचे अध्यक्ष शैलेश लाहोटी, सचिव ड आशिष बाजपाई, सहसचिव शरदकुमार नावंदर, उपाध्यक्ष राजेंद्र मालपाणी, कोषाध्यक्ष ईश्र्वरप्रसाद डागा, कमलकिशोर अग्रवाल, शांतीलाल कुचेरिया, किशोर भराडिया, आनंद लाहोटी, डॉ. अनिल राठी, रवींद्र व्होरा, संगीता लाहोटी आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव ड आशिष बाजपाई यांनी केले. संस्था अध्यक्ष शैलेश लाहोटी यांनीही यथोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आनंद कुलकर्णी व योगिता संदीकर यांनी केले तर संस्थेचे सहसचिव शरदकुमार नावंदर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला श्री मारवाडी राजस्थान शिक्षणसंस्था अंतर्गत सर्व शाळांतील गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूरमध्ये केशवराज शैक्षणिक ...

करण्यात आले असून २ हजार भाविक बसू शकतील अशा भव्य मंडपाची उभारणी केली जात आहे. व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र आणि विश्व सर्वच स्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रचित ग्रामगीता ही प्रेरक तर आहेच मार्गदर्शकही सिद्ध झाली आहे. याच ग्रामगीता प्रणित राष्ट्रभक्ती सत्संगाचे आयोजन स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने केले आहे.सर्व राष्ट्रभक्त मंडळींनी कुटुंब,मित्र व सहकारी यांच्यासह या राष्ट्र चेतना शिबीरात सहभागी व्हावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

20 TO 26 DECEMBER 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 19/12/2021 3:33 PM Page 1



# 'भाऊंना भावांजली' महोत्सवांतर्गत 'लॉकडाऊन डायरी' चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन



**जळगाव/प्रतिनिधी**

संजीवनी फाउंडेशन संचलित व परिवर्तन जळगाव आयोजित पद्मश्री भवरलाल जैन यांच्या जयंती निमित्ताने 'भाऊंना भावांजली' महोत्सवाची सुरूवात जिल्ह्यातील प्रसिद्ध चित्रकारांनी साकारलेल्या 'लॉकडाऊन डायरी' या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी ट्रस्टच्या विश्वस्त ज्योती जैन यांच्याहस्ते भाऊंच्या उद्यानातील चित्रकार वसंत वानखेडे कलादालनात झाले. या चित्रप्रदर्शनात राजू महाजन, राजू बाविस्कर, विकास मल्हारा, विजय जैन, शाम कुमावत, पिसुर्वो सुरळकर या सहा प्रसिद्ध चित्रकारांसह निलेश शिंपी, ओशीन मलारा, प्रसेन बाविस्कर या युवा चित्रकारांच्या चित्रांचा समावेश आहे. या चित्र प्रदर्शनास खासदार उन्मेश पाटील यांनी भेट देऊन चित्रकारांची संवाद साधला व चित्रे समजावून घेतली. या प्रदर्शनात लॉकडाऊनच्या अस्वस्थ दिवसात साकारलेली राजू महाजन यांची निसर्गाशी भासमय संवाद करणारी सृजनानंद देणारी रचना चित्रे, राजू बाविस्कर यांची समाजभान देणारी चेहरे हरवलेली, विषण्ण करणारी चित्रे, विकास मलारा यांची काळ्यापांढऱ्या रंगसंगत करडयाच्या विविधतेने नटलेली छायाभासी अमूर्त चित्रे, श्याम कुमावत यांची अजिंठा खजुराहोचा अभिजात वारसा सांगणारी रेषा लालित्य असलेली जलरंग चित्रे, विजय जैन यांची गुढतेला स्पर्श करणारी अमूर्त चित्रे, पिसुर्वो सुरळकर यांची मनावर कोरणारी ठासीव, समकालीन प्रवाहातील उस्फूर्त आवेगी चित्रे, निलेश शिंपी यांची जगण्यातील संघर्ष अधोरेखित करणारी सृजनचित्रे, ओशीन मलारा यांची जलरंगातील पारदर्शी नजाकत ल्यालेली हळूवार रेषात्म व्यक्तिचेहरे चित्रे, प्रसेन बाविस्कर यांची 'टू बी ऑर नॉट टू बी' मन द्वंद्व दर्शवणारी उस्फूर्त रचनाचित्रे मांडलेली आहेत. हे चित्र प्रदर्शन दिनांक १९ डिसेंबर पर्यंत संध्याकाळी चार ते रात्री दहा वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. चित्र साक्षरता समाजात रूजावी, चित्रास्वाद घडावा म्हणून कला रसिकांनी या चित्रप्रदर्शनात आवर्जून भेट द्यावी असे आवाहन परिवर्तनतर्फे शंभू पाटील यांनी केले आहे.

# भिवंडीत 'मोबाईल टॉवर'वर कारवाई करण्यात पालिका प्रशासनाची कुचराई



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट असतानाच एक मोबाईल टॉवर उभारणाऱ्या कंपनीने रस्त्यावर अतिक्रमण करीत टॉवर उभारल्याचा प्रकार समोर आला आहे. शहरातील प्रभाग समिती क्रमांक एक अंतर्गत नागांव २ येथील सर्व्हे क्रमांक ९१/१४ जब्बार कंपाऊंड येथील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण करीत १० बाय १० मोजमापाचा कॉंक्रीट चौथरा उभा करून त्यावर मेसर्स इंडस टॉवर लिमिटेड व हयातुल्ला तजमुल खान यांनी संगनमत करून ४० फूट उंचीचा मोबाईल टॉवर उभारण्यात आला आहे. सूत्राने दिलेल्या माहिती नुसार या मोबाईल टॉवर उभारणीच्या कामात पालिका अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याचे बोलले जात आहे. हा प्रकार उघडकीस आल्या नंतर कुंभाकर्णी झोपेचे सोंग घेतलेल्या प्रशासनाने कारवाई करण्याचे नाटक करीत एक डिसेंबर रोजी घाईघाईत मोबाईल टॉवर उभारणारी कंपनी व जमीन मालक यांना नोटीस बजावत १५ दिवसात सदरचे अनधिकृत टॉवर काढून टाकावेत असे आदेश बजावले. परंतु त्या नंतर कोणतीही कारवाई प्रस्तावित केली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# भगवानगड परिसर ४६ गावांसाठीच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत फेब्रुवारीमध्ये होणार सुरु -गुलाबराव पाटील

## भगवानगड परिसर ४६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेसाठी १९० कोटींची तरतुद



**मुंबई/प्रतिनिधी**

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत भगवानगड परिसर ४६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम करण्यात येणार असून फेब्रुवारीमध्ये १९० कोटींच्या या कामाला सुरूवात होणार आहे, अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. मंत्रालयातील परिषद सभागृह येथे अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील भगवानगड परिसरातील ४६ गावांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीला ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, मृद व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख, ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, आमदार मोनिका राजळे, माजी आमदार चंद्रशेखर घुले, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजीव जयस्वाल, ॲड.प्रतापराव ढाकणे, भगवानगड परिसर पाणीपुरवठा योजना कृती संघर्ष समितीचे अध्यक्ष संजय बडे यावेळी उपस्थित होते. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, भगवानगड परिसरातील ४६ गावांचा या योजनेमध्ये समावेश असून जायकवाडी जलाशय बॅक वॉटर मधून या योजनेचा उद्भव आहे.

या योजनेतील ४० गावांचे या योजनेबाबतचे ठराव प्राप्त झाले आहेत. उर्वरीत गावांचे ठराव मंजूर आहेत ते तत्काळ प्राप्त करून त्यावर कार्यवाही करण्यात यावी. योजनेची जागा तसेच उंच टाक्यांच्या जागा ग्रामपंचायतीकडून उपलब्ध करून घेण्यात यावी. पाणी आरक्षणाबाबतचा प्रस्तावावर गतीने काम करावे. योजनेची संकल्पना तसेच आराखडे अंतिम करावेत. या योजनेचे काम दर्जेदार व उत्कृष्ट व्हावे यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केल्या.

# शेळ्या चोरणाऱ्या दोन महिलांना अटक




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

जोडभावी पेठ पोलिसांनी शेळ्या चोरणाऱ्या दोन महिलांसह रिक्षा चालकाला अटक केली असून त्यांच्याकडून शेळ्या व रिक्षा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. रिक्षाचालक किरण धानप्पा दोडमनी (वय २२) नंदा विठ्ठल गायकवाड, रत्नाबाई तुळशीदास गायकवाड अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. जोडभावी पेठ चे डीबी पथक गस्त घालत असताना जुना तुळजापूर नाका येथे दोन संशयित महिला रिक्षा (एमएच १३ सिटी ३६२३) मधून जात असतांना दिसल्या ती रिक्षा थांबवली असता, सदर रिक्षामध्ये शेळी दिसली. त्यानंतर रिक्षाचालक व दोन महिलेस ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी करून चोरीस गेलेली एक शेळी व रिक्षा असा ५८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. त्यांच्याकडून जोडभावी पेठ व फौजदार चावडी पोलिस ठाणे हद्दीतील दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. ही सदरची कारवाई जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब भालचिम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक केतन मांजरे तसेच खाजप्पा आरेनवरु, सोमनाथ थिटे, राजेश घोडके, गोपाळ शेळके, स्वप्निल कसगावडे, सुहास गायकवाड, यशसिंग नागटिळक, बाळू माने यांनी केली आहे.

# श्रीदत्त जयंती निमित्त वाड्यात विविध कार्यक्रम संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

श्रीदत्त जयंती म्हणजे भक्तांसाठी आनंद सोहळा, शनिवारी (दि.१९डिसेंबर) श्रीदत्त जयंती असल्याने तालुक्यातील विविध दत्त मंदिरांमध्ये भाविकांनी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले होते. पाहुनीपाडा येथे श्री गुरूदत्त चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पालखी सोहळा, सामुदायिक हरिपाठ व भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तर वाडा बस आगारात असलेल्या श्रीदत्त मंदिरात दुपारी भजनांचा व संध्याकाळी महाप्रसादाचे आयोजन केले होते, सदरच्या कार्यक्रमा मध्ये परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. तसेच पीक कॉलनी येथेगुरुदत्त युवा मित्र मंडळ व द्रोणा फाऊंडेशन संचलित द्रोण हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्य शिबीर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये ऐकून ४५ जणांनी रक्त दान करून योगदान दिले व इतर आजारांवर ८७ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले असल्याची माहिती डॉ.नितीन मोकाशी यांनी दिली.

# वाडा न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालत!



**वाडा** : वाडा तालुका विधी सेवा प्राधीकरणाद्वारे वाडा दिवाणी व फौजदारी न्यायालयात रविवारी राष्ट्रीय लोकअदालत पार पडली. लोकअदालातीमध्ये विशेष मोहीम राबवून प्रकरणे निकाली काढण्यात आली. मागील दोन वर्षाच्या कोरोना जन्य परिस्थितीत लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले नव्हते. आजची ही लोक अदालत या यावर्षातील शेवटची आहे. विविध बँकांच्या एकूण २६७ प्रकरणांपैकी ४६ प्रकरणे निकाली काढली आहेत, त्यातून ८ लाख ९१ हजार ६२७रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. यात वाडा नागरिक सहकारी पत संस्थेची सर्वाधिक प्रकरणे निकाली निघाले आहेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या ८२४ दाखल प्रकरणांपैकी १५ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. कोर्टापुढील इतर प्रलंबित प्रकरणातील एकूण ७५३ प्रकरणांपैकी १५० प्रकरणे निकाली निघाली असून एकूण २३ लाख ५२ हजार तीनशे रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. न्यायालयात दाखल झालेली प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. यात अनेक पिढ्या निघून जातात. मात्र, न्याय मिळत नाही. त्यामुळे सर्वसामान्यांना दिलासा देऊन वेळेत न्याय देण्यासाठी सर्वोच्च आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लोक अदालतीचे आयोजन करण्यात येत आहे. याप्रसंगी न्यायाधीश मनोहर सैंदाणे, वकील संघाचे पदाधिकारी, सदस्य व न्यायालयीन कर्मचारी आदी उपस्थित होते.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे शालेय विद्यार्थी व प्रवाशांचे हाल

**देवणी/शकिल मनियार**

एसटी कर्मचारी शासनामध्ये विलगीकरण करा म्हणून गेल्या दिड महिन्यांपासून संपावर गेल्यामुळे आपल्या मागण्यावर ठाम आहेत. तर शासन कोर्टाच्या आदेशाची वाट पाहत असल्यामुळे दोघांच्या आडमुठे धोरणामुळे शालेय विद्यार्थी व प्रवाशांना नाहक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. यावर लवकर तोडगा काढावे अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे. उदगीर आगार एसटी कर्मचाऱ्यांकडून प्रवासी बांधवाना परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे अव्हान करण्यात आले आहे. एसटी शासनात विलीन झाल्यास जनतेचे होणारे फायदे - १) विलीनीकरण झाल्यास एसटीच्या सार्वजनिक मालमत्तेवर होणारा भ्रष्टाचार थांबेल. २) जेष्ठ नागरिक विद्यार्थी, अंध, अपं व इतर सवलती टिकून राहतील. ३) गाव तिथे एसटी म्हणजे महाराष्ट्राचे दळणवळण आणखी बळकट होईल. ४) १७ टक्के प्रवासी कर, २७ टक्के डिझेल कर रद्द होईल, म्हणजे एसटीचे वर्षाला ३५०० हजार कोटी वाचतील. ५) टोल टॅक्स द्यावा लागणार नाही. वरील सर्व पैसा वाचला म्हणजे तिकीट दरात जवळपास ४० टक्के कपात होऊ शकते म्हणजेच जिथे शंभर रुपये तिकीट आहे तेथे साठ रुपये तिकिट होऊ शकते. परंतु एसटीचे खासगीकरण झाल्यास जनतेचे होणारे नुकसान - १) गाव तिथे एसटी जाणार नाही. २) कुठल्याही प्रकारची सवलत मिळणार नाही. ३) खाजगी मालक जनतेकडून अव्वाच्या सव्वा भाडे आकारणी करतील. ४) जोपर्यंत गाडी भरत नाही तोपर्यंत गाडी निघणार नाही. ५) विद्यार्थी पास, जेष्ठ नागरिक, पत्रकार, अंध, अपंग यांच्या योजना बंद होतील व यांचे नुकसान होईल. ६) खाजगीकरण झाल्यास जनतेला अनेक अडी अडचणीना समोरे जावे लागणार. आपली मालमत्ता टिकविण्यासाठी एसटीचे शासनात विलगीकरण होणे गरजेचे आहे असे आव्हान उदगीर आगार एसटी कर्मचाऱ्यांकडून एका परिपत्रक व्दारे केले आहे.

# संगमेश्वर विद्यालयाच्या वतीने सोनिया जायेभाये हिचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी**

एशियन गेम थायबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये सुवर्ण पदक मिळविल्याबद्दल राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी सोनिया राजेंद्र जायेभाये हिचा संगमेश्वर प्राथमिक विद्यालयात संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते गुरुवारी सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये होत्या. यावेळी कोच फरहान नबीजी, प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, मुख्याध्यापक अविनाश पवार, प्रा. राजेंद्र जायेभाये, प्रा. कविता केंद्रे, शिक्षक डी. पी. दिवटे, डी. एस. बरबदे, आर. व्ही. डुकरे, शिक्षिका एन. आर. मुंडे, ए. व्ही. माने यांची प्रमुख उपस्थिती होती. एशियन गेम थायबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये सुवर्ण पदक मिळवून सोनिया हिने लातूरचा नावलौकिक वाढविल्याचे नमूद करून प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले की, कोणत्याही स्पर्धेत यश - अपयश निश्रि्चत असते. जरी अपयश आले तरी खचून न जाता धैर्याने व जिद्दीने पुन्हा यशप्राप्तीसाठी सामोरे गेले पाहिजे. नियमित सराव, सकस आहार, वेळेचे योग्य नियोजन करून कष्ट केल्यास हमखास यश मिळते. विद्यार्थी व खेळाडुंनी नव्या जिद्दीने आणि दमाने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन केल्यानंतर सोनिया हिला फेटा बांधून शाल व पुष्पगुच्छ देऊन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सूत्रसंचालन शिक्षक जी. बी. मोरे यांनी केले तर आभार जे. जी. कावळे यांनी मानले.

# आदिम जमातीच्या भुमिहिनांना जमीन वाटप

**पालघर/प्रतिनिधी**

आदिम जमातीच्या भुमिहिनांना जमीन वाटप करणे या योजनेसाठी जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या तालुक्यातील शासकीस दराप्रमाणे जमीन विक्रीस तयार असल्यास या कार्यालयास खालील प्रमाणे कागदपत्रांसह दि.२४.१२.२०२१ पर्यत अर्ज सादर करावेत. असे आवाहन प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार, जि.पालघर आयुषी सिंह यांनी केले आहे. अर्जदाराचा विहीत नमुन्यातील अर्ज. (जमीन विक्री करणारा, जमीन मालक), शेतजमीनीवर कोणताही बोजा नसल्याबाबत संबंधीत तलाठी यांचे प्रमाणपत्र व ७/१२ उतारा, संबंधीत परीसरातील प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा सेवा सोसायटीची कुठल्याही प्रकारची थकबाकी, नसल्याबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र, संबंधीत परीसरातील कृषी पतपुरवठा करणाऱ्या बँकेचे कुठल्याही प्रकारची थकबाकी नसल्याबाबतचे नाहरकत प्रमाणपत्र, प्रस्तावित विक्रीच्या शेतजमिनीचे क्षेत्रफळ बरोबर असल्याचा मोजणी विभागाचे टाचण व नकाशासह अहवाल, जिल्हा समितीपुढे सादर केलेल्या प्रस्तावातील शेतजमिन समितीने खरेदी करणे बंधनकारक असणार नाही, याची शेतजमिन विक्री करणाऱ्यास जाणीव असल्याबाबतचे घोषणापत्र व जमिनीच्या खरेदी प्रक्रियेमुळे कोणताही नुकसान भरपाई मागणार नसल्याबावत व सदर जमिनीबाबत कोणत्याही न्यायालयात वाद सुरु नसल्याबाबत व विक्री प्रस्तावातील जमिन कुठेही गहाण नसल्याबाबतचे संबंधीत शेतजमिन मालकाचे शपथपत्र, जमीन विक्रीच्या अर्जावर शेतजमिन विक्री करणाऱ्या व्यक्तीशिवाय कुटुंबातील व्यक्तींच्या स्वाक्षऱ्या असाव्यात व त्यांचे विक्रीबाबत नाहरकत प्रमाणपत्र असावे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक २४ सन २०२०-२०२१**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदार यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. २१/१२/२०२१ ते ०४/०१/२०२२ सकाळी ११.०० ते संध्या. ४.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

फटिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०४ (चार) कामे समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | मौजे पालघर तालुक्यातील दहिसर नदीवर जाणाऱ्या रस्त्यापासून ते ऑफिस पाड्यापर्यंत रस्ता तयार करणे. ता. जि. पालघर | ७,९१,४२३/- | २५१५ ग्रामविकास कार्यक्रम |
| २. | मौजे पालघर तालुक्यातील सोनावे मुख्य रस्ता ते टेपरीपाडा रस्ता तयार करणे. ता. जि. पालघर | ८,११,११०/- | २५१५ ग्रामविकास कार्यक्रम |
| ३. | पालघर तालुक्यातील पारगांव मुख्य रस्ता ते माध्यमिक शाळेकडे जाणारा तयार करणे. ता.जि. पालघर | ७,७४,०२२/- | २५१५ ग्रामविकास कार्यक्रम |
| ४. | पालघर तालुक्यातील गुंदवली गावातील अंतर्गत रस्ता तयार करणे. ता.जि. पालघर | २,४३,६६३/- | २५१५ ग्रामविकास कार्यक्रम |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २१/१२/२०२१ ते दि. ०४/०१/२०२२ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. ०७/०१/२०२२ संध्याकाळी ५.४५ नंतर शक्य झाल्यास.

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
शासकीय विश्रामगृह आवार,
जुना मनोर रस्ता, वेवुर रोड,
पालघर (पुर्व) - ४०१ ४०४.
दिनांक : १२/०३/२०२१

**सही/-**
**(माधव वा. शंखपाळे)**
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, पालघर

**जिमाका/पालघर/जाहि ६४/४८९/२०२१ दिनांक : १७/१२/२०२१**

# पालघरमध्ये 'ड्रोन'द्वारे कोरोना लस वाहतूक यशस्वी

**पालघर/प्रतिनिधी**

सध्या संपूर्ण जगात वेगवेगळया क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेऊन आपली कामे जलद व सुलभ रित्या पार पाडली जात आहेत. या श्रृंखलेमध्ये महाराष्ट्रातील पालघर जिल्हयाच्या जव्हार तालुक्यातील अतिदुर्गम व लांबच्या कार्यक्षेत्रात ड्रोनद्वारे लस पुरवठा करण्याचा नाविन्यपूर्ण प्रयोग करण्यात येत आहे. सदर प्रयोग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ब्लु इन्फिनीटी इनोवेशन लॅब व आयआयएफएल फाऊंडेशनच्या मदतीने राबविण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये 'ड्रोन'द्वारे लसवाहतुकीमुळे अतिदुर्गम भागात जलद गतीने लस पोचवता येईल ज्यामुळे शितसाखळी अबाधीत राहील आणि प्रवासादरम्यान होणाऱ्या वेळेची व मनुष्यबळाची बचत होईल. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर पुढील काळात ड्रोनद्वारे अत्यावश्यक औषधे पाठविणे, रक्त पाठविणे, प्रत्यारोपनाकरिता अवयव एका संस्थेतुन दुसऱ्या संस्थेत पाठविणे बिना अडथळा व अत्यंत कमी वेळामध्ये सहज शक्य होईल. सदर उपक्रम डॉ. प्रदीप व्यास, अतिरीक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य व डॉ. रामास्वामी. आयुक्त सार्वजनिक आरोग्य तथा अभियान संचालक एन.एच.एम; यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली पालघर जिल्हयाच्या आरोग्य विभाग, जिल्हा परिषद यांचा सहकार्याने राबविण्यात येत आहे. हा उपक्रम राबवितांना मा. जिल्हाधिकारी व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संचालक सार्वजनिक आरोग्य विभाग आणि उपसंचालक मुंबई मंडळ ठाणे यांचे मार्गदर्शन व सहकार्य उपयुक्त ठरले आहे.



## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आरोग्य विभागाचे कौतुक

जव्हारसारख्या दुर्गम भागात ड्रोनद्वारे लस वाहतूकीचा यशस्वी प्रयोग करणाऱ्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे तसेच पालघर जिल्हा प्रशासनाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अभिनंदन केले आहे. अनेक नावीन्यपूर्ण उपक्रमांची देशपातळीवर प्रथमत: अंमलबजावणी करत महाराष्ट्राने नेहमीच आपले पाऊल पुढे टाकले आहे. ड्रोनद्वारे लस वाहतूकीच्या या उपक्रमाने दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांची आरोग्य रक्षणाची वाट अधिक प्रशस्त आणि ...पान ६ वर

# सह्यगिरी अँडव्हेंचर परिवार आयोजित कोकण कडा प्रस्तारोहन मोहिम पार!



**वाडा/प्रतिनिधी**

या मोहिमेत पहिल्या दिवशी २७ जणांनी सहभाग घेतला होता तर दुसऱ्या दिवशी ३१ जणांनी सहभाग घेऊन प्रसारण केले. कोकणकडा म्हणजे हरिश्चंद्रगडाचे आकर्षणाचे ठिकाण आणि ते पाहण्यासाठी शनिवार आणि रविवार या दिवशी भटक्यांची बरीच गर्दी असते. १९०० फुट उंच असलेला कोकण कडा आणि त्याचे रुद्र-भिषण अवतार पडण्यासाठी तुम्हाला पहिला टप्पा नवशे फुटाचा दुसरा टप्पा सहाशे फुटाचा तर तिसरा टप्पा तीनशे फुटाचा रॅपलिंग करावी लागेल. आणि त्यासाठी सर्वच वयोगटातील ट्रेकर्स मंडळी येत असतात. या साहशी मोहिमेमध्ये पुणे येथील कुमारी दिशा शिरीष सपकाळ, वय वर्ष -१०, ठाणे येथून कुमार प्रज्वल मंडलिक वय वर्ष १५, अकोले येथील शिक्षण विभागात सेवेत असलेले दिव्यांग केशव किसन बांगरे वय वर्ष -४१, तसेच नाशिक येथील छायाचित्रकार व जेष्ठ ट्रेकर्स प्रमोद अहिरे सर वय वर्षे-६०, अशा मंडळींनी या साहशी मोहिमेत सहभाग घेतला ...पान ६ वर

# लातूर ते तिरूपती रेल्वेसेवा लवकरच सुरू होण्याचे मध्य रेल्वे महाप्रबंधकांचे आश्वासन

**लातूर/प्रतिनिधी**



लातूरसह शेजारील जिल्हे व मराठवाड्यातील भक्तांसाठी महत्त्वाची असणारी लातूर ते तिरुपती रेल्वेसेवा सुरू करावी, अशी मागणी मध्य रेल्वेच्या महाराष्ट्र - मध्यप्रदेश - कर्नाटक झोनल उपभोक्ता सल्लागार समितीचे सदस्य निजाम शेख यांनी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक अनिलकुमार लाहोटी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. त्याला तात्काळ प्रतिसाद देत लाहोटी यांनी ही रेल्वे लवकरात लवकर सुरू करण्याचे आश्वासन दिले. यामुळे भक्तांची मोठी सोय होणार आहे. लातूरसह मराठवाड्यातून तिरुपती येथे बालाजीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांची संख्या मोठी आहे. परंतु थेट रेल्वे उपलब्ध नसल्यामुळे भाविकांची गैरसोय होते. ती टाळण्यासाठी लातूरहून तिरुपती रेल्वे सुरू करावी, अशी मागणी निजाम शेख यांनी यापूर्वीही केली होती. मध्य रेल्वेचे महाप्रबंधक अनिलकुमार लाहोटी लातूरच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी निजाम शेख यांनी लाहोटी यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन त्यांना सादर केले. बिदर-मुंबई गाडी ३६ तास मुंबईत थांबून असते. परत आल्यानंतर पुन्हा ३६ तास ती उभी असते. ही गाडी थेट तिरुपती पर्यंत सोडता येऊ शकते. पुणे-लातूर-खानापुर- हुमनाबाद- गुलबर्गा-वाडी- गुलकंद यामार्गे ही रेल्वे तिरुपती येथे जाऊ शकते. दररोज दीड ते दोन हजार नागरिकांना या गाडीचा लाभ होवू शकतो, अशी माहिती निजाम शेख यांनी महाप्रबंधकांना दिली. अनेक दिवसांपासून असणारी मागणी आणि या भागातील प्रवाशांची संख्या लक्षात घेता लाहोटी यांनी लवकरात लवकर ही रेल्वे सुरू करू असे आश्वासन निजाम शेख यांना दिले. यामुळे मराठवाड्यातील रेल्वे प्रवाशांची व भक्तांची अनेक दिवसांपासून असणारी मागणी पूर्णत्वास जाणार आहे. ...पान ६ वर

# प्रलंबित वैद्यकीय देयके निपटाऱ्यासाठी विशेष मोहिमेमध्ये ७९१ देयकांचा निपटारा - स्वामी




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

कोविड काळात शासनाकडून राज्यात अनेक निर्बंध लावण्यात आले होते. याच निर्बंधाचा एक भाग म्हणून शासकीय कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या उपस्थिवरही निर्बंध लावण्यात आले होते. त्याचप्रमाणे कोविड उपाययोजनेच्या कामात सर्व संवर्गीय कर्मचारी व्यस्त होते. या सर्वाचा परिणाम म्हणून जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके प्रलंबित राहिली. त्याचप्रमाणे अनेक अधिकारी व कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय कोरोना बाधित झाले होते त्यामुळे वैद्यकीय देयकांची संख्या देखील वाढली. दरम्यान जिल्हा परिषदेतील विविध कर्मचारी संघटनांनी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडे प्रलंबित वैद्यकीय देयके निपटाऱ्यासाठी मागण्या केल्या होत्या. प्रलंबित वैद्यकीय देयाकांचा आढावा घेतला असता या देयकांची संख्या मोठी असल्याचे निदर्शनास आल्याने या सर्व प्रलंबित वैद्यकीय देयकांचा निपटारा करण्यासाठी सीईओ स्वामी यांनी विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला होता.

दिनांक १८ डिसेंबर रोजी शनिवारी सुट्टी असली तरी जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शिक्षण विभागातील ११८८, ग्रामपंचायत विभाग ७०, सामान्य प्रशासन विभाग १८ असे १२७६ वैद्यकीय देयके प्रलंबित होती. शनिवारी सकाळी १० वाजल्यापासून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ शितलकुमार जाधव यांच्यासह तालुका आरोग्य अधिकारी सांगोला ...पान ६ वर

# बैलगाडा शर्यतीवरची बंदी सर्वोच्च न्यायालयाने उठवली शेतकरी आणि बैल शर्यत शौकीनांकडून जल्लोष



**वाडा/प्रतिनिधी**

बैलगाडा शर्यतीमधील बैलांना अमानुष पणे मारहार होणे,त्यांच्यावर अत्याचार करणे अशा कारणांमुळे प्रनिमित्रांनी बैलगाडा शर्यतीवर बंदी आणली होती. त्यामुळे मागील सात वर्षापासून या शर्यतीवर बंदी होती.

बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवण्यासाठी राज्य सरकारने दाखल केलेल्या याचिकेवर गुरुवारी (दि.१६डिसेंम्बर) सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी करत बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवून सशर्त परवानगी दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया नंतर महाराष्ट्रभरातील शेतकरी व बैलगाडा शर्यत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत करत वाडा तालुक्यातील मांगाठणे येथील मुस्लिम व हिंदू शेतकऱ्यांनी एकत्र येऊन फटाके फोडून व गुलाल उधळून जल्लोष साजरा केला. या प्रसंगी जितेश उर्फ (बंटी) पाटील, तोसिफ भुरे, सचिन पाटील, अजित पाटील, ऋतिक पाटील, वशिम शेख, जयवंत मोरे, योगेश विदे, संजय पाटील, नितीन पाटील, महेश निमसे, विजय पाटील, संदीप नाईक अरबाज खान, जयेश पाटील तसेच परिसरातील शेकडो शेतकरी व शर्यत शौकीन उपस्थित होते.

# पालकांनो! तुमची स्वप्ने मुलांवर लादू नका -तृप्ती अंधारे

**लातूर/प्रतिनिधी**




आधुनिक स्पर्धेच्या युगात पालकांमध्ये आपल्या मुलांना घडविण्याची जोरदार स्पर्धा सुरू असून इतरांच्या मुलांचे अनुकरण करून आपल्या मुलांचे करिअर घडविण्याचा प्रयत्न केला जातो. आपली स्वप्ने पालक मुलांवर लादतात तेव्हा भविष्यात ही मुलं यशस्वी होत नाहीत. म्हणून पालकांनी त्यांना त्यांचे भविष्य घडवू द्यावे विनाकारण आपली स्वप्ने बळजबरीने त्यांच्यावर लादू नयेत असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी केले. त्या श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या वतीने संस्था अंतर्गत श्री गोदावरीदेवी लाहोटी विद्यालय, श्री मारवाडी राजस्थान विद्यालय, बंकटलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, सौ. केशरबाई भार्गव आदी विद्यालयातील २०२० व २०२१ वर्षातील गुणवंत विद्यार्थी गौरव आणि शिष्यवृत्ती वितरण समारंभ प्रसंगी बोलत होत्या. हा कार्यक्रम शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे व शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव अनिरुद्ध जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत दयानंद सभागृहात पार पडला. २०२० वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व शिष्यवृत्तीचे वाटप दुपारच्या सत्रात झाले. याप्रसंगी बोलताना तृप्ती अंधारे आपल्या भाषणात पुढे बोलताना म्हणाल्या की पालकांचा व शिक्षकांचा एक शब्द मुलांना घडवतो व बिघडवतो देखील म्हणून त्यांच्याशी सर्वांनी प्रेमाने वागले आणि बोलले पाहिजे. त्यांची वाढ व विकास आपल्या हातात असते. मुलं हीच आपली संपत्ती असून भारताचे उज्वल भविष्य आहेत. त्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावा. श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांना दैवत मानून त्यांच्या भविष्याला आकार देण्याचे काम केले असल्याचेही तृप्ती अंधारे म्हणाल्या.

श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्था अंतर्गत विविध विद्यालयातील २०२१ वर्षातील गुणवंत विद्यार्थी गौरव व शिष्यवृत्ती वितरण समारंभाच्या सकाळच्या सत्रात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव अनिरुद्ध जाधव म्हणाले की विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक कौशल्या बरोबर सर्वांगीण विकास झाला पाहिजे. परीक्षेतील यश आयुष्यभर येईल असे नाही तर इतर गुण सुद्धा आत्मसात केले पाहिजे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व संवेदनशील बनले पाहिजे यासाठी त्यांची भावनिक विचारसरणी वाढणे गरजेचे आहे. अशा विचारसरणीचे विद्यार्थी कोणत्याही संकटाला तोंड देऊ शकतात व कोणत्याही विकाराला बळी पडत नाही. पालक, शिक्षक, शाळा व सहकाऱ्या विषयी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आदर वाढला पाहिजे. व्यक्तिमत्त्व संवेदनशील असेल तरच त्यांच्यामध्ये दुसऱ्यांबद्दल आदर वाढतो म्हणून विद्यार्थ्यांनी केवळ गुणवत्तेला महत्त्व देऊ नये त्यासोबतच सर्वांगीण विकासालाही महत्व द्यावे. श्री मारवाडी राजस्थान विद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्याने अनिरुद्ध जाधव यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला व ...पान ६ वर

# वसई न्यायालयात लोकन्यायालयाला चांगला प्रतिसाद

## लोकन्यायालयात दाखल व दाखलपूर्व अशी ३,५९३ प्रकरणे निकाली

**पालघर/प्रतिनिधी**




महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे व जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, ठाणे ए.ज.मंत्री यांचे मार्गदर्शनाखाली वसई न्यायालयात शनिवार दि. ११ डिसेंबर २०२१ रोजी पार पडलेल्या लोकअदालतीमध्ये दिवाणी व फौजदारी स्वरुपाची तडजोडीस पात्र तसेच दाखल तसेच दाखलपूर्व अशी एकुण ३,५९३ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली. एकंदरीत रु.५कोटी ५६ लाखाची तडजोड झाली.

या लोकअदालतीत वसई विरार शहरातील वाहतुकीच्या नियमांचे उल्लघंन करणाऱ्या वाहनचालकांवर वाहतुक पोलीसांनी ई चलनाव्दारे कारवाई करण्यात आलेली ७,०१४ प्रकरणे निकाली करण्यात येउन २८ लाख ४० हजार तिनशे रुपये दंडस्वरूपातील रक्कम वसुल करण्यात आली, तसेच वसई-विरार शहर महानगरपालीकेची असलेली घरपट्टीची थकीत प्रकरणे ठेवण्यात आलेली असुन एकुण ५५२ प्रकरणामध्ये ३ कोटी १३ लाख १५ हजार रुपयांची घरपट्टीची थकीत असलेली रक्कम आकारण्यात आली व कौटुंबिक वाद विवादातुन अनेक दिवसांपासुन ताटातुट झालेल्या पती पत्नी यांची कौटुंबिक स्वरुपाची प्रकरणे लोकन्यालयाच्या माध्यमाने मिटविण्यात आली व दुरावलेल्या पती पत्नी व चिरमुडयांच्या जीवनात हास्य फुलविणारा हा दिवस ठरला. या लोकअदालतीच्या आयोजन प्रसंगी जिल्हा न्यायाधीश - १ तथा अध्यक्ष तालुका विधीसेवा समिती, वसई डॉ. सुधीर देशपांडे यांनी लोकांनी आपसातील असलेले किरकोळ स्वरुपाचे दिवाणी, फौजदारी, कौटुंबिक वाद प्रकरणे व समज-गैरसमज अशा काही करणांमुळे दुभंगलेले संसार अशी प्रकरणे समोपचाराने मिटविण्यासाठी लोकन्यायालय हे उत्तम साधन असुन नागरिकांनी या संधीचा प्रत्येक लोकअदालतीत लाभ घ्यावा तसेच दिनांक १२/०३/२०२२ च्या लोकअदालतीची लगेचच तयारी सुरु झाली असुन जास्तीत जास्त पक्षकारांनी तडजोडीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# लातूरमध्ये केशवराज शैक्षणिक संकुलाचे राष्ट्र चेतना शिबीर ग्रामगीता प्रणित तीन दिवसीय राष्ट्रभक्ती सत्संगाचे आयोजन



**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित श्री केशवराज शैक्षणिक संकुलाच्या वतीने दि.२० ते २२ डिसेंबर या कालावधीत राष्ट्र चेतना शिबीर तसेच ग्रामगीता प्रणित राष्ट्रभक्ती सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे.सु.श्री.रामप्रियाश्रीजी यांच्या सुमधुर वाणीतून या कालावधीत सत्संगाचा लाभ होणार आहे.दि.२०,२१ व २२ डिसेंबर रोजी दररोज दुपारी ३ ते ७ या कालावधीत हा सत्संग होणार आहे. तत्पूर्वी सोमवार दि.२० डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर चौक या मार्गावर ग्रामगीता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सत्संग आयोजन समिती स्थापित करण्यात आली आहे.कला, साहित्य, शिक्षण व पर्यावरण तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा त्यात समावेश आहे.नितीन शेटे, उद्धव फड, प्रा.नागेश जाधव, प्रा.महादेव गव्हाणे, प्रा.रमेश भारती, डॉ.प्रणिती चाकूरकर, राहुल गायकवाड, अनंत सूर्यवंशी, गालिब शेख, अजय बोराडे पाटील, गोपी साठे, उमा व्यास, कल्पना भट्टड व सुपर्ण जगताप यांचा या समितीत समावेश आहे. राष्ट्रभक्ती सत्संगाची जय्यत तयारी केली जात आहे. समितीच्यावतीने भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह नितीन शेटे यांच्या हस्ते ग्रामगीता ग्रंथाचे विमोचन ...पान ६ वर